cmyk



दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

मराठवाडा
मुक्तिसंग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
मुक्तिसंग्राम लढ्यातील
सर्व हुतात्म्यांना अभिवादन

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४२ | बुधवार, दि.१७ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यांत लाखो हेक्टर पाण्यात !

## शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात ; कृषिमंत्री दत्ता भरणेंची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.**



'ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचे काम युद्ध पातळीवर सुरू ▶▶ पान २ वर

### “ या जिल्ह्यांत झाले सर्वाधिक नुकसान

नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत.राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

### “ शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये – कृषीमंत्री

कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, राज्य सरकार त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळेल. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये, योग्य मार्गदर्शन घेऊन आपली शेती सुधारण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे. ऑगस्ट–सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानामुळे शेतकरी आणि राज्यासाठी मोठा आव्हान उभा राहिला आहे. मात्र, योग्य वेळेत नुकसानभरपाई, मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होण्याची शक्यता आहे.

# महानगरपालिका, नगरपालिका निवडणुका आता पुढच्या वर्षी ?

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर; ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता पुढच्या वर्षी होणार आहेत. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पार पाडावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले आहे. निवडणुकीसाठी मुदतवाढ मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोग आणि सरकारने सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी करताना




दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकात पुढच्या वर्षी होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

मंगळवारच्या सुनावणीत आमच्याकडे पुरेसे ईव्हीएम नाही, गरजेनुसार मनुष्यबळ नाही आणि सणासुदीचे दिवस आहेत त्यामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात यावी अशी मागणी राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात केली होती. त्यावर कोर्टाने म्हटले की, राज्याच्या निवडणूक आयोगाला ज्या ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्याबाबत राज्याच्या सचिवांना पत्र लिहावे, ३१ ऑक्टोबरपर्यंत तुम्ही कर्मचाऱ्यांची मागणी करा. आम्ही ४ महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. मग आता उशीर का होतोय असा प्रश्न कोर्टाने विचारला. आम्ही निवडणुकांची प्रक्रिया सुरू केली आहे. ती तातडीने होणे शक्य नाही म्हणून कालावधी वाढवून हवा असे राज्य निवडणूक आयोगाने सुनावणीत ▶▶ पान २ वर

## महाराष्ट्र सदन प्रकरणी भुजबळांना दिलासा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळ्याप्रकरणी चिमणकर बंधूंना मुंबई उच्च न्यायालयाने दोषमुक्त केले. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि राजेश पाटील यांच्या खंडपीठाने कृष्णा चिमणकर, प्रशांत चिमणकर आणि प्रसन्न चिमणकर यांना दोषमुक्त केले. याच चिमणकर बंधूंनी नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनाचे बांधकाम केले आहे.**



महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी तत्कालीन बांधकाम मंत्री छगन भुजबळ यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. या प्रकरणी भुजबळ काही काळ तुरुंगातही जाऊन आले. नंतर महायुतीसोबत गेल्यानंतर ▶▶ पान २ वर

# फरार अर्चना कुटे जेरबंद!

पुणे । प्रतिनिधी

**लाखो लोकांच्या अब्जावधी रुपयांवर डल्ला मारून गेल्या वर्ष दीड वर्षापासून फरार असलेल्या कुटे ग्रुपच्या प्रमुख आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रकरणातील आरोपी अर्चना कुटे आणि अन्य एका महिलेस पुणे येथून अटक करण्यात आल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.**



ऑक्टोबर २०२३ मध्ये कुटे ग्रुपच्या सर्वच समूहांवर इन्कम टॅक्स विभागाच्या वतीने छापा घालण्यात आला होता. मोठ्या प्रमाणात इन्कम टॅक्स चोरी केल्याचे उघडकीस आल्यानंतर कुटे यांची सर्व प्रतिष्ठान सील करण्यात आले होते.

द कुटे ग्रुपवर इन्कम टॅक्स विभागाकडून कारवाई झाल्यानंतर त्याचा परिणाम ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या व्यवहारावर झाला. मोठ्या प्रमाणात ज्ञानराधामध्ये ठेवी ठेवलेल्या ठेवीदारांना पैसे मिळण्यास अडचणी येऊ लागल्या. पेनिक होऊ नका, शांततेने घ्या, आपल्याला लोन मंजूर झाले आहे, अशा मोठ्या बाता ▶▶ पान २ वर

# खाडाखोड असेल तर कुणबी प्रमाणपत्र देऊ नये !

## ओबीसी उपसमितीच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

मराठा समाजाला कुणबी नोंदीच्या आधारे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत कोणत्याही कागदपत्रावर खाडाखोड असेल तर प्रमाणपत्र देऊ नये, असा महत्त्वपूर्ण निर्णय ओबीसी उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.१६) ओबीसी उपसमितीची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा झाली. कुणबी प्रमाणपत्र वितरणाची पारदर्शकता राखणे आणि खोट्या कागदपत्रांवर प्रमाणपत्र न देणे हा महत्त्वाचा मुद्दा होता.

या बैठकीला अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, इतर मागासवर्गीय कल्याण मंत्री अतुल सावे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी प्रत्यक्ष ▶▶ पान २ वर


# कार पुलावर आदळली; चालकासह परळीचे व्यापारी ठार

केज । प्रतिनिधी

**मुंबई येथून परळीकडे जाणारी कार पुलाच्या कठड्याला धडकून झालेल्या भीषण अपघातात परळी येथील एका व्यापाऱ्यांसह, कारचालक असे दोघेही जागीच ठार झाले. हा भीषण अपघात मंगळवारी (दि.१६) पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान केज तालुक्यातील कदमवाडी शिवारात झाला. अपघातात कार चक्काचूर झाली आहे.**

परळी येथील बूट, चप्पलचे ठोक विक्रेते इम्रान कच्छी त्यांचा कारचालक अझरुद्दीन बाबामियाँ शेख हे दोघेजण सोमवारी रात्री मुंबई येथून कारने (एमएच ०२ सीएच ६७८९) परळीकडे प्रवास करत होते. मंगळवारी (दि.१६) पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान अहमदपूर – अहिल्यानगर ▶▶ पान २ वर

## रेल्वे उदघाटन समारंभावर जिल्हा रेल्वे कृती समितीचा बहिष्कार–माजी आ. राजेंद्र जगताप



बीड । प्रतिनिधी

अनेक वर्षापासून बीडकर नागरिक चातकासारखी ज्या रेल्वेची वाट पाहत आहेत, तिचे औपचारिक उद्घाटन काही तासावर आले असताना ही स्वप्नपूर्ती होण्यासाठी ज्यांनी खऱ्या अर्थाने यासाठी संघर्ष केला त्या रेल्वे कृती समितीला जिल्हाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमास निमंत्रण दिले नसल्याने, या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला ▶▶ पान २ वर

## जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा–धनंजय मुंडे



परळी वै.। प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ मतदारसंघासह बीड जिल्ह्यात सर्वदूर अतिवृष्टी व पावसाने मोठे नुकसान केले आहे. ५०% पेक्षा अधिक खरीप पिके पाण्याने नासून गेली आहेत. बहुतांश भागात शेतात गुडघाभर पाणी साचलेले आहे, तर अनेक ठिकाणी पुराचे पाणी शेतात शिरल्याने शेतात दगड गोट्यांचे खच साचले आहेत, अनेक गावांमध्येही पुराचे पाणी शिरून ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### 'जनआरोग्य'मधील उपचारांची संख्या वाढवणार

मुंबई : केंद्र सरकारची प्रधानमंत्री जनआरोग्य आणि राज्य सरकारच्या महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेतील उपचारांची संख्या १ हजार ३५६ वरून २ हजार ३९९ पर्यंत वाढविण्यात येणार आहे. सोबतच, पाच लाखांपेक्षा जास्त रकमेच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी कॉर्पस्? फंड तयार करण्यास मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या नियामक परिषदेच्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी आरोग्य हमी सोसायटीची बैठक पार पडली. बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होते. तसेच, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

नागपूर : महानगर क्षेत्रातील कोराडी (ता.कामठी) या ठिकाणी पर्यावरणीय पर्यटन स्थळ (ईको टुरिझम) विकसित करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महाजनको) यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार पर्यटनस्थळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीची २३२.६४ हे. आर. जागा नागपूर प्रदेश विकास प्राधिकरणाला ३० वर्षाच्या भाडे करारावर प्रतिवर्ष १/– रूपये भाडेपट्टयावर हस्तांतरीत करण्यात येणार आहेत.

**महाराष्ट्राची आर्थिक अवस्था नेपाळसारखी**

लाकडी बहिण योजना, कौशल्य विकास आणि एसआरए योजनेमुळे राज्यावर ९ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये २४ हजार कोटींचे कर्ज घेतले गेले आहे. राज्य कर्जबाजारी होत आहे. राज्याची आर्थिक अवस्था नेपाळसारखी झाली आहे, असा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मंगळवारी माध्यमांशी बोलताना केला. यावेळी राऊत म्हणाले की, राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत आहे. गेल्या तीन महिन्यांत २४ हजार कोटींचे कर्ज घेतले गेले आहे. म्हणूनच आम्ही म्हणतो की, राज्याची आर्थिक स्थिती नेपाळसारखी झाली आहे. आम्ही नेपाळचा संदर्भ दिला की, ते आम्हाला माओवादी ठरवतात. नेपाळही असाच लुटला गेला. आर्थिक असंतोषातूनच नेपाळची जनता रस्त्यावर उतरली आणि सरकारविरोधात बंड केले.

### योजनांचा वापर राजकीय फायद्यासाठीच–बच्चू कडू

अमरावतीः प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेती प्रश्नावरुन राज्य सरकारवर जोरदार टीका केली. शेतकरी कर्जमाफी, अतिवृष्टी, शेतमालाचे दर शेतकरी आत्महत्या या मुद्यावरुन त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला. कर्ज घेणं हे कांही चुकीचे नाही. कर्ज घेतल्यानंतर ते कशावर खर्च केले जातो हे महत्वाचे आहे. राज्य सरकार आता सांगत आहे की, आता आमच्याकडे पैसे नाहीत. मात्र निवडणुकी अगोदर तुम्ही लाडक्या बहिणींना तीन हफ्ते एकत्र पैसे दिले. जशी निवडणूक झाली तशी अर्ध्या लाडक्या बहिणी अपात्र केल्या. पैशाअभावी लाडका भाऊ प्रशिक्षनार्थी योजना ही बंद करुन टाकली. कारण हा फक्त निवडणूकीपुरता कार्यक्रम होता अशी टीका कडू यांनी केली. हा मदत म्हणून कार्यक्रम नसून त्यांचा राजकीय वापर करुन घेण्यासाठी होता असे कडू म्हणाले. निवडणूक आयोग भाजपाच्या कार्यालयातून चालावा. ईव्हीएम देखील भाजपाच्या कार्यालयात ठेवा लोक येतील बटन तुम्ही दाबा अशी टीका कडू यांनी केली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०.०० क्विंटल | २,४०० | २,९०० | २,६६० |
| ज्वारी/हायब्रिड: ८८.०० क्विंटल | १,७०० | ३,१४५ | २,४७८ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १७.५० क्विंटल | ६,००० | ६,१६० | ६,०८६ |
| उडीद : ७१.०० क्विंटल | ४,१५१ | ६,१५१ | ५,०३१ |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | १,८०० | २,८०० | २,४८८ |
| मुग:३४.०० क्विंटल | ३,७०० | ७,२७१ | ५,७२९ |
| सोयाबीन:९.५० क्विंटल | ३,५०० | ४,२५० | ३,८७५ |
| हरभरा:३.५० क्विंटल | ४,९०० | ६,२१० | ५,४६७ |




cmyk

## अग्रलेख

# तेजस्वीच राहणार आश्वासक चेहरा !

बिहारमधील गेल्या पंधरा वर्षांच्या राजकारणामध्ये तेजस्वी यादव यांचा राजकीय प्रभाव वाढत चालला आहे हे नाकारण्याचे कारण नाही. राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा खरा राजकीय वारसा सांभाळणाऱ्या तेजस्वी यादव यांनी आपल्या पक्षालाही चांगली प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय जनता दलाने चांगली कामगिरीही आतापर्यंत केली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये १४३ जागा लढवून राष्ट्रीय जनता दराने ७५ म्हणजे सर्वात जास्त जिंकल्या होत्या. तेजस्वी यादव यांच्या चेहऱ्याची आणि त्यांच्या शैलीची बिहारमध्ये क्रेझ आहे हे नाकारता येत नाही. पण गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि इतर नेते ज्या प्रकारे बिहारमध्ये कॅम्पेनिंग करत आहेत ते पाहता मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून तेजस्वी यादव यांची घोषणा त्यांना मान्य असेल का, हेसुद्धा पहावे लागेल. बिहारमधील काँग्रेसच्या नेत्यांच्या म्हणण्याप्रमाणे, काँग्रेसने निवडणूक आयोगाला लक्ष्य करून मतचोरीचा जो विषय समोर आणला आणि बिहारमध्ये ज्या विविध प्रकारच्या रॅली काढल्या त्यामुळे सरकार विरोधी वातावरण तयार झाले आहे.

राष्ट्रीय जनता दलाला सर्व २४३ जागा लढायच्या आहेत हा त्याचा वरवरचा अर्थ असला, तरी महागठबंधनच्या राजकारणामध्ये उमेदवार कोणीही असला तरी माझा चेहरा समोर ठेवूनच सर्व मतदारसंघांमध्ये मतदान करावे, असे अप्रत्यक्षपणे तेजस्वी यादव यांनी मतदारांना सुचित केले आहे. महागठबंधनमध्ये काँग्रेसचा सुद्धा वाटा महत्त्वाचा असावा अशी बिहारमधील काँग्रेस नेत्यांचीही अपेक्षा आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने फक्त ७० जागा लढवल्या होत्या आणि त्यापैकी १९ जागांवरच काँग्रेसला विजय मिळवता आला होता. बिहारमध्ये काँग्रेसचा तेथील स्थानिक नेता राज्याचा चेहरा म्हणून समोर येत नसला तरी राहुल गांधी यांचा चेहरा या निवडणुकीसाठी वापरण्याचे धोरण काँग्रेसने पत्करले आहे. गेल्या आठवड्यात बिहारमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेमध्ये राहुल गांधी यांना जेव्हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, असा प्रश्न विचारला असता त्यांनी त्या प्रश्नाचे उत्तर टाळले होते. याच पार्श्वभूमीवर आता तेजस्वी यादव यांनी आपल्या ताज्या राजकीय सभेमध्ये बिहारमध्ये सर्व जागांवर तेजस्वी यादवच उभे आहेत असे गृहीत धरून मतदान करा, हे जे आवाहन केले आहे त्याचा अर्थ मुख्यमंत्रिपदाचा चेहरा मीच आहे हे गृहीत धरा हाच होऊ शकतो. बिहारमध्ये प्रादेशिक पातळीवर इतर कोणताही नेता सध्या तेजस्वी यादव यांच्या एवढा लोकप्रिय किंवा चर्चेत नसल्यामुळे महागठबंधनच्या घटक पक्षांना तेजस्वी यादव यांचे नेतृत्व मान्य होण्यासही हरकत नाही. यानिमित्ताने महागठबंधनमध्ये कोणता पक्ष किती जागा लढवतो हा विषयसुद्धा महत्त्वाचा ठरणार आहे. गेल्या वेळेपेक्षा आपल्याला जास्त जागा मिळाव्यात अशी अपेक्षा काँग्रेसने आधीच व्यक्त केली आहे. पण गेल्या वेळेपेक्षा कमी जागा घेण्यास राष्ट्रीय जनता दलालाही इच्छा नाही.

महागठबंधनमधील सर्वच पक्ष नितीशकुमार यांना विरोध करण्यासाठी एकत्र आले असल्यामुळे जागा वाटपाबाबत वादविवाद जरी झाले तरी एखाद्या तोडग्यापर्यंत पोहोचून ही आघाडी नितीशकुमार यांना आव्हान देण्यासाठी मैदानात उतरेल हे निश्चित आहे. या आघाडीचा चेहरा म्हणून तेजस्वी यादवच समोर येत आहेत हे वास्तवही या निमित्ताने नाकारता येत नाही. तेजस्वी यादव यांनी आतापर्यंत दोनवेळा बिहारचे उपमुख्यमंत्रिपद भूषवले असल्यामुळे आणि बिहारमधील तरुण मतदारांमध्ये त्यांची मोठी क्रेझ असल्यामुळे यावेळी निश्चितच तेजस्वी यादव यांचा चेहरा मतदारांना नितीशकुमार यांच्या सत्ताधारी चेहर्यापेक्षा जास्त आश्वासक वाटला, तर बिहारची ही निवडणूक निश्चितच रंगतदार होणार आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने मतचोरीच्या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणात वातावरण निर्मिती केली असली, तरी जागावाटपाच्या चर्चेमध्ये काँग्रेसला नेहमीसारखीच तडजोड करावी लागेल असे दिसते. तेजस्वी यादव यांनी नव्याने केलेल्या नेतृत्वाच्या या विधानावरून काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांची काय भूमिका आहे हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. पण सध्या तरी तेजस्वी यादव यांच्या कामाचा धडाका आणि त्यांना वाढत चाललेला पाठिंबा पाहता मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून तेजस्वी यादव यांनाच प्रोजेक्ट करावे लागेल हे गृहीत आहे.

## तार चोरी करणारी टोळी जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

**स्थानिक गुन्हे शाखेची केस परिसरात पेट्रोलिंग चालू असताना संशयावरून त्यांनी एका कारमध्ये जवळपास ३०० किलो अल्युमिनियम ची तार घेऊन जाताना चोरास ताब्यात घेतले याची किंमत जवळपास पाच लाख ४० हजार एवढी आहे.**

बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या व घरफोड्या सारख्या गुन्हयाला प्रतिबंधक व्हावा व गुन्हे उघडकीस यावेत यासाठी पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांचे अधिपत्याखाली वेगवेगळे पथके तयार करुन गुन्हे उघडकीस आनण्यासाठी आदेशीत केले आहे. यावरुन पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांचे पथक केज उपविभागात गुन्हे प्रतिबंध पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहीती मिळाली की ईसमनामे अजय काशीनाथ पवार रा. चौसाळा हा त्याचे कडील स्विफट गाडीमध्ये चोरीची अॅल्युमिनीअम तार घेवुन विक्री करण्याकरीता बीड येथे येणार आहे. यावरुन पथकाने मांजरसुभा गावाचे समोर राष्ट्रीय महामार्गावर सापळा लावुन अजय पवार यास गाडीसह ताब्यात घेतले. त्याचे गाडीची तपासणी केली असता त्याचे गाडीत एकुण १४ गोण्यामध्ये अॅल्युमिनीअम तारेचे तुकडे वजनी ३०० किलो मिळुन आले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदरची तार ही त्याचा साथीदार याचे सह मिळुन मागील चार महीन्यापुर्वी नेकणुर, माजलगाव, पाटोदा व परळी येथुन चोरी केलेली असल्याचे सांगितले. चोरीच्या तारेपैकी काही तार त्याने विक्री केली असल्याचे सांगितले. तपासाअंती त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी नेकनूर ,माजलगाव ग्रामीण, पाटोदा परळी आदी ठिकाणी कलम ३०३ प्रमाणे गुन्हे दाखल झालेले आहेत. सदर आरोपीकडुन एकुण ५,४०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यास पुढील तपासकामी पोलीस स्टेशन नेकणुर यांचे ताब्यात देण्यात आले असुन तपास सुरु आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर , पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड/१२४९, पोहवा जफर पठाण/ २०९१, पो. अं बप्पासाहेब घोडके/६५०, चापोहवा गणेश मराडे/११८५ यांनी केली आहे.

## • फलोत्पादन (जिरायत खाते) विभागाची जागा व्यापारी संकुलासाठी नगरपंचायतीकडे हस्तांतरित

# ३५ वर्षांचा व्यापारी संकुलाचा प्रश्न मार्गी;केजवासीयांची स्वप्नपूर्ती-हारुणभाई इनामदार,सिताताई बनसोड

**केज । प्रतिनिधी**

**केज शहरातील ३५ वर्षापासून रखडलेला व्यापारी संकुलाचा प्रश्न केज नगरपंचायत चे गटनेते मा. हारुण इनामदार व नगराध्यक्षा मा. सिताताई बनसोड यांच्या अथक परिश्रमातून मार्गी लागल्यामुळे केजवासियां मधून आभार व्यक्त होत आहेत.**





केज नगरपंचायत मध्ये गटनेते, हारुन इनामदार व केज नगरपंचायत च्या विद्यमान अध्यक्षा मा. सौ. सिताताई बनसोड यांच्या नेत्रत्वा खाली केज शहरा चा विकास अगदी झपाट्याने होत असल्याचे दिसून येत असून केज शहरातील अत्यंत्य जुना व सर्वांच्या जिव्हाळ्या चा प्रश्न म्हणजे फलोत्पादन खात्यातील जागा व्यापारी संकुलासाठी मिळावी यासाठी मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिताताई बनसोड यांनी अथक परिश्रम करून मार्गी लावला असून राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी फलोत्पादन ( जिराईत खात्याची ) जागा व्यापारी संकुलास दिली असून तसे आदेश दिले आहेत त्यामुळे ३५ वर्षापासून प्रलंबीत असलेला व्यापारी, व्यावसाय धारक यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे केज शहरातील नागरीकातून मा. हारूनभाई इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिता ताई बनसोड यांचे आभार मानले आहेत, मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या नेतृत्वा खाली केज शहराचा विकास होत असून शहराचा चेहरा मोहरा बदलत असून व्यापारी संकुलाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे केज वासियांतून केज नगर पंचायत चे आभार व्यक्त होत आहेत. तसेच नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

## खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे –प्रा.कोकलगावे

**परळी वै.। प्रतिनिधी**

**येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते कै.सुंदरराव सोळंके साहेब यांच्या जयंती निमित्त थर्मल कॉलनीतील न्यू हायस्कूल ज्युनिअर कॉलेज येथे व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी बोलताना जेष्ठ प्राध्यापक आर.एम.कोकलगावे यांनी खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे तसेच खेळाने शारीरिक आणि मानसिक विकास होतो असे प्रतिपादन केले.**

शालेय समितीचे अध्यक्ष श्री नानासाहेब सोळंके काका यांच्या मार्गदर्शनानुसार व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री किशन मोरे व उपप्राचार्य श्री सुनील लोमटे यांच्या नियोजनानुसार सदरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन उपप्राचार्य सुनील लोमटे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन स्पर्धेचा उद्देश विशद केला.महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी अकरावी व बारावी वर्गाच्या वेगवेगळ्या टीम स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या होत्या. पुढे बोलताना प्रा.कोकलगावे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी खेळाचे जीवनामध्ये असणारे महत्त्व लक्षात घेऊन स्वतःमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. या प्रसंगी प्रा.रविशंकर स्वामी,क्रिडा मार्गदर्शक प्रा.अनिल इथापे,प्रा.जयंत फूलेकर,प्रा.डॉ.अंकुराराव वाघमारे,प्रा सुरजकुमार मुंडे,प्रा.बाळासाहेब देशमूख,प्रा.सुनील बिराजदार,प्रा.संभाजी राख,प्रा.नेहरकर सर,प्रा.बालासाहेब राऊत,प्रा.राहूल नलावडे,प्राध्यापिका भालेराव मॅडम,प्राध्यापिका खंडागळे मॅडम श्री शंकर बादाडे ,महादू कांबळे तसेच इतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष पदाची धुरा बद्रीनाथ जगताप यांच्या खांद्यावर

**हिंगोली । प्रतिनिधी**

**भांडेगाव येथील भाजपचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले बद्रीनाथ उत्तमराव जगताप यांची मंगळवारी १६ सप्टेंबर रोजी भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली ही निवड आमदार तानाजीराव मुटकुळे व भाजपा हिंगोली जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांच्या आदेशाने भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांच्याहस्ते नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.**



बद्रीनाथ जगताप हे मागील दहा वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे काम करत आहेत त्यांनी या अगोदर विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात संपूर्ण जिल्ह्यात संघटन उभे करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला व कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवल्या याचीच पोचपावती म्हणून त्यांना भाजपच्या युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करून पक्षाने मोठी जिम्मेदारी सोपवली आहे त्यांच्या या निवडीमुळे युवा मोर्चाचे संघटन मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे बोलले जात आहे. यावेळी भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव अरुणजी पाठक भाजपचे पूर्व हिंगोली जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांबाळे यांची उपस्थिती होती.

## पान ६ वरून...

### माजलगाव धरणातून

मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्याने मंजरथ येथील गोदावरी नदीपात्रातील तुंभ सांडस चिंचोली पर्यत आला असल्याने तसेच सिंदफाना नदीपात्रात माजलगाव धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्याने माजलगाव तालुक्यातील सांडस चिंचोली गावाला पूराचा वेढा पडला आहे. नदीपात्रातून बाहेर आलेल्या पाण्याने गावांना बेटाचे स्वरूप आले आहे. पैठणच्या जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रात व माजलगाव धरणातून सिंदफाणा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सोडल्याने माजलगाव तालुक्यातील सांडस चिंचोली गावचा संपर्क तुटलेला आहे.त्यामुळे प्रवाशास या आपत्कालीन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी जोस्तना मुळीक यांनी अलीकडीले गाव देपेगांव येथून सांडस चिंचोली गावकऱ्यांशी संपर्क ठेवला आहे.यापूर्वी देखील या गावात सन १९९१ व सन २००५ साली आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने या ठिकाणी लष्कराच्या सहाय्याने पुरस्थीती निर्णय झाली होती तेंव्हा पुरात अडकलेल्या लोकांना मदतकार्य राबवण्यात आले होते.माजलगाव धरणातुन सिंदफाणा नदीपात्रात सोडण्यात आले पाणी व जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रात सोडलेल्या पाण्यामुळे मंजरथ येथील गोदावरी नदीपात्रातील पुराचा आलेला तुंभ यामुळे सांडस चिंचोली गावात हि परिस्थिती उद्भवली यावर प्रशासन लक्ष ठेवून असुन आता आम्ही सर्व परस्थितीवर बारकाईने लक्ष देत असून गावकऱ्यांनी सतर्क रहावे असे आवाहन तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले आहे.

-----------

### पुरातील नुकसानग्रस्तांचे

मदत कशी मंजूर करायचे हे मी पाहून घेतो असा धीर शेतकऱ्यांना दिला.कडा येथील पुरामधे अडकलेल्या सापते कुटुंबाची भेट घेतली त्यावेळी कुटुंबाने पुरात अडकल्यानंतर काय हाल झाले हे जाणून घेताना जरांगे पाटील यांना अश्रू अनावर झाले होते.त्यानंतर कडा येथील अनेक छोटे-मोठे व्यवसायिकांचे पुरामुळे दुकाने वाहून गेले आहेत यामध्ये कोट्यावधी रुपयाचे नुकसान झाले आहे या सर्व व्यवसायिकांची तातडीने पंचनामे करून तात्काळ मदत देण्याची मागणी पाटील यांनी केली. पुरामध्ये शेकडो जनावर आहे वाहून गेले आहेत.याचे पंचनामे करताना पशुधन अधिकारी हे मृत जनावर दाखवून त्याचे पोस्टमार्टम करावे लागेल असे सांगत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी करताच त्यावर जरांगे पाटील म्हणाले की,पुरामध्ये वाहून गेलेले जनावरे पंचनामा करण्यासाठी कुठून सापडून आणायचे ? याचा शासनाने विचार करून शेतकरी जे संख्या सांगेल त्या संख्येप्रमाणे नोंद घेऊन जनावरांची भरपाई देण्याची मागणी यावेळी केली.तसेच व्यवसाय करणाऱ्या व शेतकऱ्यांना खचून जाऊ न देण्याचे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले .आपण पुन्हा नव्या उमेदीने व्यवसायाला व शेतीसाठी तयार राहावे असे आवाहन पाटील यांनी केले.

-----------

### चौसाळा महसूल मंडळात

दत्तात्रय(पिनू काका) नाईकवाडे, युवा नेते बाळासाहेब जोगदंड, नंदू आबा जोगदंड प्रवीण शिंदे, उमेश जोगदंड, प्रवीण पाटील, दीपक झोडगे, बाळू बारंगुळे,पत्रकार पंडित अण्णा जोगदंड, विकास नाईकवाडे हे उपस्थित होते.तर चौसाळा तलाठी कार्यालयाचे तलाठी कमलेश निर्मळ साहेब यांनी पिकासह व पूर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी तलाठी साहेबांनी पिक पाहणीची, व पूर परिस्थिती माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांन तात्काळ कळविली आहे असे म्हणाले तर नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहण्याचे व पुराच्या पाण्यात न उतरण्याचे आवाहन केले.

-----------

### कपिलधार येथे भुस्खलनाचा

कोसळली आहे. तसेच रहदारी साठी योग्य असलेला रस्ता देखील खचत चालला आहे. त्यामुळे जीवित हानी टाळण्यासाठी व कपिलधारवाडी ग्रामस्थांना कोणताही धोका होणार नाही यासाठी सर्वतोपरी तथा उचित कार्यवाही करावी. तसेच पुढील धोका टाळण्यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव सादर करावे व आजघडीला जी हानी झालेली आहे याबाबतीत दुरुस्ती करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी बीडच्या जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रकातून केली आहे.

-----------

### तात्काळ मदत जाहीर करा

का नाही हा प्रश्न शेतकऱ्या पुढे निर्माण झाला आहे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत आला आहे अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने स्पॉट पंचनामे सुरू करून कोणताही निकष न लावता सरसकट शेतकऱ्याला नुकसान भरपाई जाहीर करावी नसता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना बरोबर घेऊन शासनाच्या विरोधात आंदोलन ही करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

-----------

### बीड जिल्हा राज्यात नंबर

संचालक संगीतादेवी पाटील यांनी दिले आहेत. घरकुल बांधकामाच्या संदर्भात ज्या तालुक्यातील कामे मागे आहेत त्या तालुक्याचे गटविकास अधिकारी, संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांचा आढावा घेऊन कान टोचण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे

-----------

### खाजगी वाहनास रेल्वे स्टेशन

आहे. तसेच त्या नागरीकांना सदर पार्कंग स्लॉट येथून कार्यक्रम स्थळी पाहचवीण्यासाठी मिनी बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच बीड शहरातील नागरीकांना कार्यक्रमस्थळी पोहच्यासाठी शहरातील विविध ठिकाणी पिकअप पॉईन्ट ठेवण्यात आले आहेत. जसे की, बार्शीनाका, नगर नाका, बशीरगन्ज, छत्रपति शीवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, माळीवेस, बलभीम चौक, बालेपीर या ठिकाणी नागरीकांसाठी पिकअप पॉईन्ट ठेवण्यात आलेले आहेत. नागरीकांना कार्यक्रमस्थळी घेवून जाणे व परत आणुन सोडण्याची सर्व जबाबदारी जिल्हा प्रशासनाने घेतलेली आहे. त्यामुळे नागरीकांनी आपले खासगी वाहन कार्यक्रमस्थळी घेवुन जावू नये जेणेकरुन आपली गैरसोय होणार नाही असे आवाहन जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन बीड यांचेकडून करण्यात येत आहे.

------------

## पान १ वरून...

### अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यांत

असून लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरु आहेत. अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने या परिस्थितीचा सामना करावा, राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभें आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात पावसाचे थैमान चालूच असून, गेल्या दोन दिवसांत अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. ६५४ महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खरिपातील सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

---------

### महाराष्ट्र सदन प्रकरणी

छगन भुजबळ यांना मोठा दिलासा मिळाला. महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाने भुजबळांना क्लीनचिट दिली. याच प्रकरणात चिमणकर बंधूंना आता दोषमुक्त करण्यात आले आहे. सन २००५ मध्ये कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता याप्रकरणी विकासकाची नेमणूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. त्यानंतर पीएमएलए अंतर्गत याप्रकरणी ईडीनंही कारवाई केली होती. एसीबीच्यावतीने मुंबई सत्र न्यायालयात आयपीसी कलम ४०९ (लोकसेवक असूनही सरकारी मालमत्तेचे नुकसान) आणि कलम ४७१ (अ) (बोगस कागदपत्रे तयार करणे) यानुसार आरोप ठेवले होते.

-----------

### महानगरपालिका, नगरपालिका

म्हटले. त्यावर सप्टेंबर ते जानेवारी इतका वेळ तुम्हाला का हवा असे कोर्टाने विचारले. त्यावर या प्रक्रियेला वेळ लागतोय असा युक्तिवाद त्यांनी मांडला. त्यावर सुप्रीम कोर्टाने आदेश काढत ३१ जानेवारी २०२६ पर्यंत आम्ही तुम्हाला मुदतवाढ देतो. तुमच्या कामात गती आणा. वेळापत्रक निश्चित करत ३१ जानेवारीच्या आत महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या निवडणूका पूर्ण झाल्या पाहिजेत असे कोर्टाने सांगितले. सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला यावेळी चांगलेच फटकारले.

---------

### खाडाखोड असेल तर कुणबी

पुरावे दाखवून जात प्रमाणपत्र देताना कशी खाडाखोड किंवा ओव्हरराईटिंग केली जाते, हे स्पष्ट केले. नियमाप्रमाणे पात्र असणाऱ्यांना कुणाचाही आक्षेप नाही; मात्र चुकीच्या पुराव्यांवर कुणालाही सर्टिफिकेट देऊ नये, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. छगन भुजबळ यांच्या मुद्द्याची दखल घेत बैठकीत कुणबी किंवा मराठा कुणबी प्रमाणपत्र देताना कोणत्याही खोट्या किंवा खाडाखोड केलेल्या कागदपत्रांना मान्यता दिली जाणार नाही. तसेच, चुकीच्या पुराव्यांवर प्रमाणपत्र वाटप होऊ नये, यासाठी अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले. ओबीसींच्या निधी वाटपाच्या प्रश्नावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. ओबीसी मंत्रालयाला २९०० कोटी रुपये मिळाले पाहिजेत अशी मागणी यावेळी करण्यात आली. राज्यातील २२ ओबीसी महामंडळांना निधी मिळण्यासाठी पुरवणी मागण्या अर्थमंत्रालयाकडे सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, ओबीसींसाठीच्या शिष्यवृत्ती योजना सुरू राहाव्यात, सर्व जिल्ह्यांत वसतिगृह असावीत आणि विभागीय कार्यालय स्थापन व्हावीत, अशी मागणीही करण्यात आली. बैठकीत ओबीसींच्या नोकरभरतीतील अनुशेष भरणे, शिष्यवृत्ती थकबाकी देणे, तसेच वसतिगृह व विभागीय कार्यालयांची उभारणी याबाबत ठोस निर्णय घेण्यात आले. या सर्व मुद्द्यांचा अहवाल आता राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे.

---------

### फरार अर्चना कुटे जेरबंद!

मारणारे व्हिडिओ कुटे यांच्यावतीने मीडिया मधून प्रसारितही करण्यात आले. परंतु ठेवीदारांना छदामही मिळाला नाही. अखेर सुरेश कुटे, अर्चना कुटे, आशिष पाटोदकर, यशवंत कुलकर्णी यांच्यासहित संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांवर बीड, संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, पुणे अशा विविध ठिकाणी गुन्हे दाखल झाले. जून २०२४ मध्ये सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांना पोलिसांनी अटक केली. त्यांच्यासोबत अर्चना कुटे एसपी कार्यालयात आल्या होत्या, परंतु तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी कुटे मॅडमला चहा- कॉफी करून परत पाठवले. पोलिसांच्या आशीर्वादावर तब्बल वर्षभर पुणे, मुंबई, महाबळेश्वर अशा ठिकाणी ऐश करत फिरणाऱ्या अर्चना कुटे यांना अखेर पोलिसांनी पुणे शहरातील पाषाण रोड भागातून अटक केली आहे. त्यांच्यासोबत आशिष पाटोदकरच्या आईला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

-------

### रेल्वे उदघाटन समारंभावर जिल्हा रेल्वे कृती

गेला आहे. याची माहिती माजी आमदार राजेंद्र जगताप यांनी पत्रकाद्वारे दिली. अहिल्यानगर -बीड -परळी रेल्वे सुरु होण्यासाठी दहा वर्षाचा सततचा संघर्ष करत असताना, ज्या बीड जिल्हा रेल्वे कृती समितीने प्रसंगी गुन्हे अंगावर घेतले, ज्यात अडीचशे आंदोलकावर गुन्हे दाखल केले गेले. ज्यात काही जणांनी तुरुंगवासही भोगला होता. पुढे ते सर्व आंदोलक निर्दोष सुटले पण गुन्हे दाखल होण्याची भीती न बाळगता ज्या लोकांनी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती म्हणून कायम हा प्रश्न ऐरणीवर आणला त्यांनाच कार्यक्रमाला न बोलवण्याचे काम प्रशासन का करत आहे हे न सुटणारे कोडे आहे. बीडकर जनतेचे रेल्वेचे स्वप्नं प्रत्यक्षात यावे यासाठी माजी आ. राजेंद्र जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ज्या रेल्वे कृती समितीने तत्कालीन मंत्री स्व. विमल मुंडदा, मुख्यमंत्री विलासराव देशमुख, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या माध्यमातून तत्कालीन रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव यांच्याकडे पाठपुरावा केला त्या बीड जिल्हा रेल्वे कृती समितीने या सुवर्णक्षणासाठी घेतलेले परिश्रम विसराळी टाकत या समितीला निमंत्रण न दिल्याने बीड जिल्हा रेल्वे कृती समिती नागरिक संघटना अध्यक्ष आणि आंदोलकानी या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला आहे.

---------

### कार पुलावर आदळली; चालकासह

या राष्ट्रीय महामार्गांवर केज तालुक्यातील कदमवाडी शिवारातील पुलाजवळ कारचालकाला डुलकी लागली.यामुळे नियंत्रण सुटून भरधाव कार पुलाच्या कठड्यावर धडकली. या भीषण अपघातात इम्रान इब्राहिम कच्छी (५०) आणि चालक अझरुद्दीन बाबामिया शेख (४०,दोघे रा. परळी) हे जागीच ठार झाले. माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम, सहाय्यक उप निरीक्षक अशोक सोनवणे, पोलीस नाईक रशीद शेख, व चालक शिंदे यांनी अपघातस्थळी धाव घेतली. पोलिसांनी प्रशांत नेहरकर आणि सुमित तेलंग यांच्या रुग्णवाहिकेतून जखमीना केज येथील रुग्णालयात रवाना केले. येथे तपासणी करून डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. डॉ. आयेशा शेख यांनी मृतदेहांचे शवविच्छेदन केले. दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान दोघांचेही पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. दोघांवर ही परळी येथे दफनविधी संस्कार करण्यात आले.

--------

### जिल्ह्यात ओला दुष्काळ

नुकसान झाले असून, घरांची पडझड, संसारोपयोगी साहित्याचे नुकसान, धान्याचे नुकसान, पशू धनाची हानी, ग्रामीण भागातील रस्ते - पुल तुटणे किंवा वाहून जाणे, संरक्षक भिंती खचने असे अनेक प्रकारचे नुकसान झाले असून, परळी सह संपूर्ण बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून, त्या निकषानुसार मदत जाहीर करावी, अशी मागणी आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे परळी तालुक्यात झालेल्या नुकसानीची आज धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी तालुक्यातील वाण टाकळी, बोधेगाव, मोहा, कावळे वाडी, वंजारवाडी, गर्देवाडी इत्यादी गावांना भेटी देऊन शेती पिकांच्या तसेच अन्य नुकसानीची पाहणी केली. वाण टाकळी गावात नदीचे पाणी शिरल्याने प्रचंड नुकसान झाले असून, स्थानिक आपत्ती निवारण निधीतून संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले असल्यास त्या ठिकाणी तातडीची मदत करण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. काही ठिकाणी पुराचे पाणी शेतात शिरल्याने शेतात दगड गोटे तसेच रस्त्याचे डांबर वाहून आले आहे, अशा परिस्थितीत नेमका कसा पंचनामा करणार, असा प्रश्न मुंडेंनी उपस्थित केला. दरम्यान नुकसान झालेले रस्ते, पुल इत्यादींच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने दखल करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. दरम्यान या भागातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, ऊस यांसह पिकांचे मोठे नुकसान झाले असून, खरिपात शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करणार असल्याचे श्री मुंडे म्हणले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, बालाजी (पिंटू) मुंडे, विष्णुपंत सोळंके, विष्णुपंत देशमुख, मोहनराव सोळंके, प्रदीप (बबलू) मुंडे, माऊली तात्या गडदे, माऊली मुंडे, भानुदास डीघोळे, ज्ञानोबा सलगर, अंगद मुंडे, राजाभाऊ हांगे, तुकाराम मुंडे, अभिमन्यु गडदे, अशोकराव दिघोळे, फुलचंद चाटे, बलभीम शेरकर, नमाजी गडदे त्याचबरोबर उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांसह तालुका कृषी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, महावितरणचे अभियंता यांसह मंडळ अधिकारी आदी उपस्थित होते.

---------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ ३

## थोडक्यात...

### तात्काळ पंचनामे करा -राहुल जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरुर तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. या तीनही तालुक्यातील अनेक भाग पाण्याखाली गेला असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत.सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. गावांमधील रस्ते, ओढे व पुलांवर पाणी आल्याने मोठमोठे खड्डे पडल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उपयोगी साहित्य देखील वाहुन गेले आहे.प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पंचनामे करावे व तत्काळ शेतकऱ्याला मदत करावी. सततच्या पावसामुळे लोकांच्या घरे पडले आहेत त्यांचेही पंचनामे करून तात्काळ मदत करावी.अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी मा.तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.

### शंकरराव बरकसे यांचे निधन

गेवराई । प्रतिनिधी



येथील कोल्हेर रोडवरील आश्रमशाळेसमोर वास्तव्यास असलेले शंकरराव रंगनाथराव बरकसे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवारी रात्री १० . ३० वाजता निधन झाले . त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले ,एक विवाहित मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे . स्व . शंकरराव बरकसे हे प्रा . राजेंद्र बरकसे यांचे बंधू व अवनी कॉम्प्युटर्सचे संचालक गणेश बरकसे यांचे ते वडिल होते . स्व . शंकरराव बरकसे यांच्या पार्थिवावर सोमवार दि . १५ रोजी दुपारी १२ वाजता चिंतामणी स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक नातेवाईक अंत्ययात्रेत सहभागी झाले होते . सुस्वभावी स्वभावामुळे स्व शंकरराव यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ पसरली आहे .

### हजरत खाजा मगदूम अन्सारी (बुवा सिध्द)यांच्या यात्रेला सुरुवात

पात्रुड । प्रतिनिधी

हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक असणारे धार्मिक स्थळ म्हणजे हजरत खाजा



मगदूम अन्सारी(बुवा सिध्द)यांचा संदल व उरूस प्रती वर्षी प्रमाणे या ही वर्षी १६ सप्टेंबर २०२५ रोजी वार मंगळवारी या दिवशी सायं ७.३० ते ८.०० च्या सुमारास अन्सारी ब्रदारी यांच्या येथून खतीब साहेबांच्या तोषे खणा मार्गे संडल मिरवणुकीचे प्रस्थान होईल व ढोल ताशाचया गजरात रातर भर वाजत गाजत संदल चा आनंद घेत खादिम रस्ता मार्गे दर्गा हजरत खाजा मगदूम अन्सारी येथे सकाळी ४.३० चया दरम्यान पोहोचणार आहे या ठिकाणी दुआ होईल हलवा चपाती अन्सारी बिरादरी यांच्या कडून वाटप होईल सनदल व उरूस निमित येणाऱ्या हिंदू मुस्लिम भाविक भक्तांचा स्वागत गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे

### सेवा पंधरवाडा राबविण्यासाठी महसूल विभाग सज्ज

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये सेवा पंधरवाडा साजरा करण्यात येणार आहे.सेवा पंधरवाडा कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येत असून,या पंधरवड्यात विभाग निहाय अधिकारी-कर्मचारी सज्ज असून शेतकऱ्यांनी आपली कामे करून घ्यावीत असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत सेवा पंधरवडा राबविण्या संदर्भात तहसीलदार वैशाली पाटील यांनी सोमवार दि.१५ रोजी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.पत्रकात पुढे म्हटले आहे की,छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये सेचा पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात येणार असून,हा पंधरवडा ३ टप्यात राबविण्यात येणार आहे.यात पांदण रस्ते विशेष माहीम कालावधी १७ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर, सर्वांसाठी घरे कालावधी २२ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर,नाविन्यपूर्ण उपक्रम राविणे कालावधी २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत वरील उपक्रम राबविण्यात येणार असून,या पंधरवड् ?यात वरील दर्शविलेली विविध कामे करून घेण्यासाठी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा,असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.



माजलगाव : टाकळसिंग गावामध्ये नदीपात्राच्या पाण्यात ढगफुटीमुळे वाढ झाल्याने जगताप कुटुंब हे अडकले असता आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीआरएफ टीमच्या साह्याने सुखरूपपणे बाहेर काढण्यात आले

# डिजिटल मीडियामधील पत्रकारांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरू -एस.एम.देशमुख

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिले राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडले. यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना मोठी घोषणा केली आहे. 'डिजिटल मीडियामधील पत्रकारांना आजही शासन दरबारी पत्रकार म्हणून मान्यता दिली जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे. एखादी बातमी काही क्षणामध्ये जगभर पोहोचवणाऱ्या डिजिटल मीडियातील पत्रकारांच्या प्रश्नांबाबत सरकार चालढकल करीत आहे. सरकारने तातडीने या पत्रकारांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा वेळप्रसंगी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषद रस्त्यावर उतरून आंदोलन करू,' असा इशारा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला आहे.



माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड, ज्येष्ठ पत्रकार तुळसीदास भोईटे, धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, रवींद्र पोखरकर यांनीही या अधिवेशनात मार्गदर्शन केले. याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टिवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धी प्रमुख भरत निगडे, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो.पी.लांडगे, डीजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.या अधिवेशनात पत्रकारांच्या समस्यांना वाचा फोडत देशमुख यांनी 'पत्रकारांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात' अशी मागणी केली. एस.एम.देशमुख म्हणाले, 'पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे उलटली तरी सरकारने अधिसूचना काढलेली नाही. यु ट्युबवर काम करणाऱ्या पत्रकारांना पत्रकार म्हणून मान्यता मिळालेली नाही, तसेच पेन्शन व अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. राज्य सरकार पत्रकारांच्या प्रश्नांबाबत चालढकल करत आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद सातत्याने पत्रकारांच्या प्रश्नांवर आवाज उठवत असते. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियामधील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी परिषदेच्या माध्यमातून विविध आंदोलने करण्यात आली आहे. या आंदोलनामुळे पत्रकारांच्या समस्या सुटण्यास देखील मदत झाली आहे. पण आता प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडियामधील पत्रकारांसोबतच डिजिटल माध्यमात काम करणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नासाठी संघटनेचा लढा सुरू राहील, असेही देशमुख म्हणाले. डिजिटल मिडियातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळाली पाहिजे, युट्यूब चॅनल साठी सरकारी जाहिराती मिळाल्या पाहिजेत आणि ज्या सवलती प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियातील पत्रकारांना मिळतात त्या सर्व सवलती डिजिटल मिडियातील पत्रकारांना देखील मिळाव्यात अशी आग्रही मागणी देशमुख यांनी केली.. या संदर्भात आपण लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले..

या अधिवेशनाला माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी देखील भेट दिली. यावेळी त्यांनी पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व लघुउद्योगांना मदत मिळावी यासाठी मुद्रा लोनविषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर आहे, असेही ते म्हणाले.

अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भोईटे, रवींद्र पोखरकर, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे यांनी डिजिटल मीडियासंबंधी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ पत्रकार तसेच राज्याच्या विविध भागात डिजिटल माध्यम क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या पत्रकारांचा देखील सन्मान करण्यात आला.

## किसान सभेची उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे व गोदावरी नदी, सिंदफना नदीला आलेल्या अचानक पाण्यामुळे नदीकाठच्या शेतात व गावामध्ये प्रचंड प्रमाणात पाणी गेल्याने झालेल्या नुकसानीबाबत प्रशासनाने तात्काळ पाऊले उचलावीत यासाठी माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना किसान सभा तालुका कमिटीच्या वतीने निवेदन देण्यात आले.व उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव या कार्यालयासमोर किसान सभेच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

यावेळी माजलगाव तालुक्यात अतिवृष्टी व महापुराने झालेल्या नुकसानीचे तात्काळ





पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी यासाठीच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या किसान सभेच्या वतीने या निदर्शने आंदोलनाला उपस्थिती माकपा तालुका सचिव कॉम्रेड शिवाजी कुरे,कॉम्रेड बाबा सर,किसान सभा तालुका अध्यक्ष कॉ.कृष्णा सोळंके,किसान सभा तालुका सचिव कॉ.अशोक डाके किसान सभा तालुका सदस्य कॉ.गणेश कदम, कॉ.पोपट गायकवाड,सुरज सोळंके,परमेश्वर कदम, विकास थेटे,राजेंद्र तौर, शिवाजी राऊत, दत्ता घुले, दीपक गुंजकर, प्रवीण तातोडे, जनक तेलगड,विनय डक, विनोद सोळंके, शुभम सोळंके,आदी शेतकरी उपस्थित होते

## रेल्वेसाठी पाठपुरावा केल्याचा आनंद-खा.सोनवणे

बीड । प्रतिनिधी

बीडला रेल्वे आलीच पाहिजे, ही घोषणा लहानपणी ऐकली होती. बीड जिल्ह्यातील अनेकांनी रेल्वेसाठी आंदोलने केली, ३०० आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले. यातील काहींनी जेल भोगले. प्रकल्प मंजुरीनंतर मागील बारा वर्षात केवळ ९९ किलोमिटर रेल्वे मार्ग पुर्ण झाला होता, मात्र आपण खासदार झाल्यानंतर बारा महिन्यात ६७ किलोमिटर मार्गाचे काम पुर्ण करून पुढे वडवणीपर्यन्त हायस्पीड ट्रायल रन यशस्वी झाला आहे. या कामासाठी सततचा पाठपुरावा आवश्यक असून मी जनतेचा सालगडी म्हणून हे काम करत आहे. आपल्याला रेल्वेचे श्रेय अजिबात घ्यायचे नसून आज रेल्वे बीडला येत असून जिल्ह्यासाठी हा आनंदाचा क्षण असल्याचा उल्लेख खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

बीड येथील शासकिय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी खा.बरजंग सोनवणे यांच्यासोबत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, पिंटू ठोंबरे यांची उपस्थिती होती.

ओल्या दुष्काळाची केली मागणी



बीड जिल्ह्यात दि.१४-१५ आणि १६ रोजी सलग तीन दिवस अतिवृष्टी झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आता सरकारने पंचमाने न करता बसता शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी. मी अतिवृष्टीग्रस्तांची भेट घेतली असून त्यांचे दुखः पाहवत नाही, असेही खा.सोनवणे म्हणाले.

## दुर्गोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी देशमुख तर उपाध्यक्षपदी पवार,जोशी

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील गणेशपार दुर्गोत्सव मंडळाची कार्यकारीणी सर्व मार्गदर्शक यांच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात येवुन अध्यक्षपदी शिवाजी देशमुख तर उपाध्यक्ष पदी रमेश पवार व दीपक जोशीतसेच कार्याध्यक्षपदी सचिन स्वामी यांची निवड करण्यात आली.





परळी शहरातील जुना भाग असलेल्या गणेशपार भागात सर्व हिंदु सण सार्वजनिकरित्या साजरे करण्यासाठी या भागातील भक्तांनी पुढाकार घेत सन १९८७ साली गणेशपार दुर्गोत्सव साजरा करण्याची परंपरा सुरु केली मागील ३ वर्षात अखंडपणे दुर्गोत्सव साजरा केला जातो.गणेशपार भागातील सर्व भक्त यात सहभागी होतात.यावर्षीची कार्यकारीणी निवडण्यासाठी गणेशपार मंदिरात व्यापक बैठक पार पडली.या बैठकीत निवडण्यात आलेल्या उर्वरीत कार्यकारीणीत सचिवपदी: बालासाहेब देशमुख तसेच सहसचिव:हरिभाऊ लोखंडे , कोषाध्यक्ष: नारायण डाके ,सह कोषाध्यक्ष: शिवाजी कासार मुख्य संघटक:सत्यनारायण मानधन , गणेश सावंत, बाळू फुले प्रसिद्धीप्रमुख: बबडूशेट शर्मा , प्रकाश वर्मा , अनंत (पप्पू) कुलकर्णी मिरवणूक प्रमुख: अमोल बिडगर, राजेभाऊ गावडे, मुख्य सल्लागार: डॉ सुरेशजी चौधरी, जगदीशआप्पा चौधरी,संतोषसेट नावंदर ,गोपाळशेट जोशी, विष्णुदास भंडारी, विलास जूनाळ, राजुशेठ रांदड , रमाकांत कोलवार,नंदकुमार रामदासी,विजय जोशी, वीरकुमार स्वामी, चंदूशेठ जाजू, विनोदशेठ कोलवार, दिगंबर जोशी, वासुदेव पाठक, उत्तम दादा लोखंडे ,हनुमान सदस्य:दिनेश बेलुरे,रमेश पवार,रवी गव्हाणे,सूनील कौलवर, गणेश कोडी, लहू हालगे,राजेश लोणीकर, प्रमोद दहातोंडे, जगदीश वैद्य, राहुल लोणीकर,गोविंद भाले,शशिकांत वाघमारे,निलेश लोढा,ज्ञानेश्वर पवार,योगेश पडळकर,वैजनाथ गव्हाणे आदींची निवड करण्यात आली.या बैठकीत दुर्गोत्सव स्थापना मिरवणुक पारंपारीक पध्दतीने काढण्याचा व विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.

## जेलचा फरार आरोपी जेरबंद, गुन्हेगारांचे कर्दनकाळ बना, मी सदैव पाठीशी-काँवत



बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलिसांनी मागील सात वर्षांपासून फरार असलेल्या बहिणीच्या खुनाच्या आरोपीला पकडण्यात यश मिळवले आहे. विठ्ठल उर्फ सोनू प्रकाश काळवणे राहणार एमआयडीसी, पेठ बीड, बीडआरोपी कोविड काळात जेलच्या बाहेर आला होता आणि तेव्हापासून तो फरार होता. अखेर पोलिसांनी त्याला पकडून जिल्हा कारागृहात दाखल केले. ही खरोखरच कौतुकास्पद कामगिरी आहे. या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी टीमचे अभिनंदन केले असून तुम्ही गुन्हेगारांचे कर्दनकाळ बना, मी तुमच्या सदैव पाठीशी असल्याचे म्हटले आहे.याबरोबरच बीड शहरातील सोहेल खान नावाचा गुंड बशीर गंज भागात सामान्य नागरिकांना त्रास देत होता. या गुंडाला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.या दोन्ही यशस्वी कारवायांबद्दल बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीत बीड शहर पोलिस पथकाला प्रशस्तीपत्र देऊन शाबासकी दिली. यातून नवनीत कावत यांनी जिल्हाभरातील पोलिसांना स्पष्ट संदेश दिला आहे की, ''गुन्हेगारांची तुम्ही कर्दनकाळ बना, मी सदैव तुमच्या पाठीशी आहे.''

## मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील नावाजलेल्या राजस्थानी सेवा समाज बीड संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने दिनांक १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे झालेल्या चेतना एम्पॉवरमेंट फाऊंडेशन व हेमा फाऊंडेशन च्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील २०२५ या स्क्रीन एडिशन हा गंभीर होत चाललेल्या विषयावरील नाटिकेत इयत्ता ३ व ४ थी च्या विद्यार्थ्यांनी ३ री ते ६ वी या वर्गातील वयोगटात दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळवत संस्थेचे व शाळेचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले.**

देशातील दहा प्रमुख राज्यातील ८७ च्या वर शहरासह २५५ शाळा व कॉलेज यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या या सर्व नाटिकेत जवळपास १ हजार विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले होते. यातुन मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाला दुसऱ्या क्रमांकाचे मोठे बक्षीस मिळाले. या बक्षीसाचे स्वरूप सन्मानचिन्ह,





प्रमाणपत्र व ३१ हजारांचे रोख पारीतोषिक होते.

सध्या मोबाईल मुळे होणारे दुष्परिणाम व त्यातून आपल्या मुलांची कशी सुटका करता येईल ? या विषयावर स्क्रीन टाईम ने छिना बचपन ही नाटिका सादर करण्यात आली होती. ही नाटिका शाळेचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांच्या मार्गदर्शनाखाली व इयत्ता ३ व ४ थी च्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. प्रमुख भूमिकेत चि. घेणे समर्थ गणेश, चि.रिधम पुरूषोत्तम मालपाणी, कु. साहेबा सलीम शेख, चि.चांदणे राजवीर सतीश, चि. उपरे प्रथमेश गणेश होते. नाटीकेसाठी सौ.भंडारी मॅडम, सौ तौर मॅडम यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांना दोडे सर व लड्डा सर, पारीख मामा यांनी मदत केली. या नाटिकेसाठी पालकांनीही आपल्या विद्यार्थ्यांना व शाळेला प्रोत्साहन दिले. या नाटिकेस बक्षीस प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री विष्णूदासजी तापडिया, संस्थेचे सचिव श्री रामेश्वरजी कासट, कोषाध्यक्ष श्री गंगाबिषणजी करवा, सहसचिव श्री किशोरकुमारजी बाहेती, संचालक श्री राधेश्यामजी कासट, श्री जगदीशजी चरखा, श्री.अशोकजी मंत्री आदी संभाजीनगर येथे आवर्जुन उपस्थित होते.या यशस्वीतेबद्दल राजस्थानी सेवा समाज या संस्थेच्या सर्व संचालक मंडळ व सदस्यांनी तसेच सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

## तात्काळ पंचनामे करा -मेघडंबर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. तालुक्यातील अनेक भाग पाण्याखाली गेले असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत.

सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. कापूस, सोयाबीन, बाजरी यांसारखी पिके पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. गावांमधील रस्ते, ओढे व पुलांवर पाणी आल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारउपयोगी साहित्य देखील भिजले आहे.प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पंचनामे करावे व तत्काळ शेतकऱ्याला मदत करावी. त्या लोकांच्या घरी पडले आहेत त्यांचेही पंचनामे करून तात्काळ मदत करावी. नाहीतर वंचित बहुजन आघाडी वतीने पाटोदा तहसीलवर भव्य असा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांनी दिला आहे. दूषित पाणी व डासांच्या प्रादुर्भावामुळे रोगराई पसरण्याची शक्यता वर्तवली आहे. जनावरांच्या चार्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोग्य विभागांनी तात्काळ गावोगावी जाऊन फवारणी करावी जेणेकरून रोगराई पसरणार नाही अन्यथा२२ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालयावर मोर्चाचे काढावा लागणार असे पत्रक वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांनी काढला आहे

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३२१ दिनांक-२६/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती योगेशसिंग अशोकसिंग चव्हाण रा.वडीगोद्री ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या आजी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसराबाई धनसिंग चव्हाण | आजी | २५/०५/२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २६/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-८७८ दिनांक-११/०९/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती भाऊसाहेब रामभाऊ तट्ट रा.रोहिलागड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या आजोबा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोकींदा बळवंता तट्ट | आजोबा | ०८/१०/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३२२ दिनांक-२८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती योगेशसिंग अशोकसिंग चव्हाण रा.वडीगोद्री ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या आजोबा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | धनसिंग रामसिंग चव्हाण | आजोबा | १५/०७/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# नव्या हंगामात साखर निर्यातीचा मार्ग मोकळा

## केवळ १० लाख टन साखर निर्यातीलाच परवानगी

नव्या हंगामात साखर निर्यातीचा मार्ग मोकळा होणार त साखर निर्यातीवर निर्बंध कायम ठेवत केवळ १० लाख टन साखर निर्यातीलाच परवानगी दिली होती. पण आता नव्या हंगामात देशातील साखर उत्पादन वाढण्याचा अंदाज आहे. देशात साखरेचा पुरवठा जास्त होणार असल्याने नव्या हंगामात सरकार साखर निर्यात खुली करण्याची शक्यता आहे.

भारत हा ब्राझीलनंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश आहे. मात्र मागील दोन हंगामांमध्ये देशात उसाची लागवड कमी होऊन साखर उत्पादनावर परिणाम झाला होता. देशात २०२३ मध्ये साखर उत्पादन कमी झाले होते. मागील हंगामातही गाळपासाठी उसाची उपलब्धता कमीच होती. मात्र यंदा देशात उसाची लागवड वाढली आहे. मागील हंगामात देशात ५५ लाख हेक्टरवर उसाची लागवड झाली होती. तर यंदा ५७ लाख हेक्टरवर उसाची लागवड झाल्याचे सरकारच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. तर जाणकारांच्या मते यंदाची लागवड यापेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रासह महत्त्वाच्या ऊस उत्पादक राज्यांमध्ये यंदा लागवड वाढली आहे. त्यामुळे १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नव्या गाळप हंगामात उसाची उपलब्धता अधिक राहणार आहे. परिणामी देशातील साखर उत्पादनातही वाढण्याची शक्यता आहे. या सगळ्याचा विचार करून केंद्र सरकार नव्या हंगामात साखर निर्यातीवरील सर्व बंधने उठवू शकते, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सांगितले.




आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती पाहता साखरेच्या दरावर आधीच दबाव आहे. साखरेचा भाव आजही नीचांकी दरपातळीच्या भोवती फिरत आहे. त्यात भारताने जागतिक बाजारात निर्यात सुरु केल्यास त्याचा बाजारावर आणखी दबाव येईल. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती कमी कमी असल्याने निर्यातही वेगाने होण्याची शक्यता कमीच असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. चालू हंगामात केवळ १० लाख टन निर्यातीचा कोटा दिला होता. आतापर्यंत हा कोटाही पूर्ण झालेला नाही. निर्यात आठ लाख टनांच्या दरम्यान स्थिरावेल, असे अभ्यासकांचे मत आहे. 'साखरेची निर्यात सुरु झाल्यानंतर केंद्र सरकारला देशांतर्गत साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल आणि साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना उसाच्या एफआरपीची रक्कम वेळेत मिळण्यास मदत होईल,'असेही अधिकाऱ्यांचे मत आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे संयुक्त सचिव अश्विनी श्रीवास्तव यांनी एका जागतिक परिषदेत बोलताना सांगितले की, येणाऱ्या गाळप हंगामात साखर निर्यातीला वाव असेल. पण, आगामी हंगामात नेमकी किती साखर निर्यात केली जाऊ शकते, याबाबत ते स्पष्ट बोलले नाहीत.

पुढील हंगामात देशांतर्गत वापर आणि इथेनॉल निर्मितीसाठी लागणारी गरज पूर्ण केल्यानंतर निर्यातीसाठी साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध असेल, असा सध्याचा अंदाज आहे. श्रीवास्तव म्हणाले, "पुढील हंगामात देशातील साखरेचा वापर चालू वर्षाच्या २८० लाख टनांवरून २८५ ते २९० लाख टनांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. देशात नवीन विपणन वर्षाच्या सुरुवातीला आधीचा ५० लाख टन साखरेचा शिल्लक साठा असेल. त्यामुळे यंदा देशात साखरेचा पुरवठा चांगला राहू शकतो. आगामी हंगामात उसापासून ४.८ अब्ज लिटर इथेनॉलचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता आहे, असल्याचा अंदाज श्री. श्रीवास्तव यांनी व्यक्त केला. इंडियन शुगर आणि बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (इस्मा) व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या २०२५/२६ विपणन वर्षात साखर उत्पादन ३४९ लाख टनांपर्यंत जाईल.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

### महत्वाच्या घटना

१६३० : बॉस्टन शहराची स्थापना झाली

१९४८ : हैदराबादच्या निजामाने शरणागती पत्करली आणि हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

१९५७ : मलेशियाचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश

१९८३ : वनीसा विल्यम्स 'मिस अमेरिका' बनणारी पहिली कृष्णवर्णीय स्त्री ठरली.

१९८८: दक्षिण कोरियातील सेऊल येथे २४ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

२००१ : सप्टेंबर ११ च्या अतिरेकी हल्ल्यांनंतर न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज पुन्हा सुरू झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७९ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (मृत्यू: २४ डिसेंबर १९७३)

१८८२ : अवंतिकाबाई गोखले महात्मा गांधीच्या पट्टशिष्या, चरित्रकार, परिचारिका व 'हिंद महिला समाज'च्या संस्थापिका (मृत्यू: १९४९)

१८८५ : केशव सीताराम तथा प्रबोधनकार ठाकरे पत्रकार, समाजसुधारक, लेखक, वक्ते व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील एक प्रमुख कार्यकर्ते (मृत्यू: २० नोव्हेंबर १९७३)

१८९१ : दक्षिण अफ्रिकन गणराज्यचे पहिले अध्यक्ष मार्थिनस वेस्सेल प्रेतोरीयस यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे १९०९)

१९०० : जे. विलार्ड मेरिऑट मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (मृत्यू: १३ ऑगस्ट १९८५)

१९०६ : ज्युनिअस जयवर्धने श्रीलंकेचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ नोव्हेंबर १९९६)

१९१४ : थॉमस जे. बाटा बाटा शू कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १ सप्टेंबर २००८)

१९१५ : मकबूल फिदा हुसेन चित्रकार व दिग्दर्शक (मृत्यू: ९ जून २०११)

१९२२ : अँगोलाचे पहिले राष्ट्रपती अँगोलांनो नेटो यांचा जन्म. (मृत्यू: १० सप्टेंबर १९७९)

१९२९ : अनंत पै ऊर्फ 'अंकल पै' 'अमर चित्र कथा' चे जनक (मृत्यू: २४ फेब्रुवारी २०११)

१९३० : लालगुडी जयरामन व्हायोलिनवादक, संगीतकार व गायक (मृत्यू: २२ एप्रिल २०१३)

१९३२ : भारतीय-इंग्लिश पत्रकार इंद्रजीत सिंग यांचा जन्म.

१९३७ : सीताकांत महापात्र १९९३ चा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रख्यात ओडिया कवी

१९३८ : दिलीप पुरुषोत्तम चित्रे लेखक, कवी आणि टीकाकार (मृत्यू: १० डिसेंबर २००९)

१९३९ : रविंद्र सदाशिव भट गीतकार (मृत्यू: २२ नोव्हेंबर २००८)

१९४५ : भारतीय धार्मिक गुरु भक्ति चारू स्वामी यांचा जन्म.

१९५० : नरेन्द्र मोदी गुजरातचे पूर्वमुख्यमंत्री, प्रधानमंत्री भारत (२०१४)

१९५१ : डॉ. राणी बंग समाजसेविका

१९८६ : भारतीय क्रिकेटपटू रवीचंद्रन अश्विन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७७ : हेन्री फॉक्स टॅलबॉट छायाचित्रणकलेचा पाया घालणारे (जन्म: ११फेब्रुवारी १८००)

१९३६ : हेन्री लुईस ली चॅटॅलिअर फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ८ आक्टोबर १९५०)

१९९४ : व्हिटास गेरुलायटिस अमेरिकन लॉन टेनिसपटू (जन्म: २६ जुलै १९५४)

१९९९ : हसरत जयपुरी गीतकार (जन्म: १५ एप्रिल १९२२)

२००२ : विश्वनाथ वामन तथा वसंत बापट कवी व संगीतकार (जन्म: २५ जुलै १९२२)

# कापूस पिकातील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण

कापूस पिकावर मावा, तुडतुडे, फुलकिडी, पिठ्या ढेकूण यासारख्या रस शोषणाऱ्या किडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊ शकतो. जाणून घेऊ या कपाशीवरील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण.

यांत्रिक पद्धत : शेताचे नियमित निरीक्षण करावे. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालेली गळालेली पाते आणि बोंडे जमा करून नष्ट करावीत. शेताची कोळपणी व खुरपणी किंवा रासायनिक तणनाशकाचा वापर करून पिकाच्या सुरुवातीची ८ ते ९ आठवडे तणांचे व्यवस्थापन करावे. पीक २० दिवसाचे झाल्यावर शेतात पिवळे निळे चिकट सापळे लावावेत. एक हेक्टरसाठी १५ पिवळे व ५ निळे सापळे लावावे.

मशागतीय पद्धती : नत्र खताचा अतिरिक्त वापर टाळावा. शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन रोपांतील अंतर ठेवावे. मित्र कीटकांचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मूग यासारखी आंतरपिके, मिश्र पिके घ्यावीत. कपाशी पिकाभोवती झेंडू आणि एरंडी या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी.



जैविक पद्धती : ढाल किडा म्हणजेच लेडीबर्ड बीटल या कीटकाचे प्रौढ व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात. लेडी बर्ड बीटल पुरेशा प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक कीडनाशकांचा वापर टाळावा. सिरफीड माशी, पेंन्टाटोमीड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रॅगनफ्लाय, रॉबर माशी, गांधील माशी, प्रार्थना कीटक, टॅकनिड माशी इ. मित्र किटकांचे संवर्धन करावे. ५% निंबोळी अर्काची किंवा अॅझाडिरेक्टीन दहा हजार पीपीएम १० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिठ्या ढेकणासाठी व्हर्टिसिलीयम बुरशीची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.रासायनिक नियंत्रण पद्धती : निंबोळी तेल (५%) ५० मिली किंवा फ्लोनीकॅमीड (५०) २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन (५० ) १२ ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ एस सी ३० मिली किंवा पायरीप्रोक्झीफेन (५%) + डायफेन्थुरॉन (२५% ) २० मिली वरीलपैकी कोणत्याही किडनाशकांची दिलेल्या प्रमाणात प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

# 'गुलाबी लसूण'; जाणून घ्या लागवडीविषयी महत्त्वाच्या बाबी

अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत.

हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवित आहेत, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही.



मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते. बीड जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात गुलाबी दिसणार्या गावरान लसणाची लागवड केली जाते.

हवामान : या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गढ्ढ्यांची चांगली वाढ होते.

ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते.

जमीन : मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात.

सुधारित जाती : महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे.


आंतरपीक : लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.

# शिंगे कापली नाहीत तर जनावराना होतो धोकादायक आजार

प्राण्यांची शिंगे त्यांच्यासाठी अनेक कार्ये करतात. प्राणी त्यांच्या शिंगांचा वापर लढण्यासाठी आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी करतात. पण बघितले तर त्यांच्या शिंगांचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. प्राण्यांची शिंगे कापण्याला शास्त्रज्ञांच्या भाषेत डी-हॉर्निंग म्हणतात.

धोकादायक आजार :

मोठ्या आणि लांब शिंगे असलेल्या प्राण्यांना सर्वात धोकादायक आजार झाल्याचे अनेकदा दिसून आले आहे. शिंगाच्या पेशी प्राण्यांमध्ये अनावश्यकपणे वाढतात, जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. वास्तविक, अशा परिस्थितीत शिंगे लवकर मऊ होऊ लागतात आणि नंतर हळूहळू एका बाजूला लटकू लागतात. त्यामुळे प्राण्यांच्या डोक्यात खूप वेदना होतात आणि ही वेदना कायम राहते. ज्याचा परिणाम असा होतो की प्राण्याचे डोके एका बाजूला झुकते. काही दिवसांनी शिंग स्वतःच तुटून पडते. अशा स्थितीत जनावराच्या



डोक्याच्या आतील बाजूस एक जखम राहते. यासोबतच प्राण्याच्या डोक्याचे मांसही हळूहळू कुजते. काही दिवसात या जखमेत जंत येऊ लागतात, जे कॅन्सरचे रूप घेतात. यावर वेळीच उपचार न मिळाल्यास जनावराचा मृत्यू निश्चित आहे. प्राण्यांच्या शिंगांवर एक जाड थर असतो, त्याला कवच म्हणतात हे तुम्ही अनेकदा पाहिले असेल. शिंगाच्या आजूबाजूच्या भागात प्राण्यांच्या आपसी भांडणामुळे, खाज सुटणे आणि इतर अनेक आजारांमुळे किंवा शिंग कुठेतरी अडकल्यास हे कवच बंद होते. अशा स्थितीत जनावराच्या डोक्यातून भरपूर रक्त बाहेर पडते, जे घरगुती उपायांनी अजिबात बरे होत नाही. अशा स्थितीत पशुपालक बांधवांनी आपल्या जनावरांना ताबडतोब जवळच्या डॉक्टरांकडे पाहावे. अनेक प्राण्यांची शिंगे वाढून मागून वळतात आणि प्राण्यांच्या डोक्यात किंवा कानाजवळच्या जागेत शिरतात, असेही आढळून आले आहे. जे प्राण्यांसाठी धोकादायक आहेत.

काळजी घेण्याची गरज : ही सर्व परिस्थिती टाळण्यासाठी जनावरांची शिंगे वेळोवेळी कापली पाहिजेत. काही प्राण्यांची शिंगे कापणीनंतर खूप सुंदर दिसतात हे तुम्ही अनेकदा पाहिलं असेल. काही पशुपालक त्यांच्या जनावरांना सुंदर आणि अद्वितीय दिसण्यासाठी शिंग कापण्याबरोबरच त्यांना रंगीबेरंगी रंगही देतात.

# सेंद्रिय दशपर्णी अर्क, तयार करण्याची पद्धती आणि वापर

खरीप पिकांवर सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.



दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर : कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य : प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.







# एक महिन्यात एसटीचे आरक्षण द्या, नसता मुंबई जाम करु!



जालना। प्रतिनिधी

हैदराबाद स्टेट गॅझेट नुसार बंजारा समाजास अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी अखिल भारतीय बंजारा आरक्षण समिती आणि सकल बंजारा समाजाच्या वतीने सोमवारी ( ता.१५) जालना शहरात विराट महामोर्चाचा काढण्यात आला. लाखोंच्या संख्येने महिला व समाज बांधवांनी मोर्चात सहभाग नोंदवला. हैदराबाद गॅझेट लागू करतांना महाराष्ट्र शासनाने दुजाभाव करू नये, बंजारा समाजास गॅझेट नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण द्यावे, एक महिन्यात आरक्षणाचा लाभ न दिल्यास महाराष्ट्रातील कोट्यावधी बंजारा समाज बांधव मुंबईत घुसून मुंबई जाम करतील.असा इशारा समाज बांधवांतर्फे या वेळी देण्यात आला. आंध्रप्रदेश ,तेलंगणा प्रमाणे बंजारा समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ देण्यात यावा या मागणीसाठी सोमवारी सकाळी १०.०० वा. मस्तगड येथून मोर्चास सुरुवात झाली. मोर्चात समोर रथांमध्ये बंजारा समाजातील राष्ट्रसंत सेवालाल महाराज, स्व. वसंतराव नाईक यांच्या सह महापुरुषांच्या प्रतिमा, बंजारा संस्कृतीचे दर्शन घडविणारे भजनी मंडळ, वाद्यवृंद, पारंपरिक वेशभूषेत महिला, समाजबांधव मागण्यांची फलके घेऊन सहभागी झाले.

आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं.., बंजारा समाजास एसटीचे आरक्षण लागू करा,,,लागू करा.., संत सेवालाल महाराज की जय ,, वसंतराव नाईक साहेबांचा विजय असो एक गोर लाखो गोर, आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही !‘‘ अशा गगनभेदी घोषणा देऊन आंदोलकांनी संपूर्ण शहर दणाणून सोडले. गांधी चमन ,शनी मंदिर, नूतन वसाहत मार्गे अंबड चौफुलीवर मोर्चाचे विराट सभेत रुपांतर झाले. चोहोबाजूंनी गर्दीने परिसर फुलून गेला. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या वेळी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.यात महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणाबाबत नुकताच हैदराबाद स्टेट गॅझेट चा आधार घेऊन जी.आर.काढला आहे. या पार्श्वभूमीवर बंजारा समाज हा हैदराबाद स्टेट गॅझेट नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडत असतांना भाषावार प्रांत रचनेनंतर महाराष्ट्रात बंजारा समाजाचा विमुक्त जाती प्रवर्गात समावेश करण्यात आला. हा अन्याय दूर करून बंजारा समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ द्यावा, हैद्राबाद गॅझेट लागू करावे, आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या स्व.पवन चव्हाण यांच्या कुटुंबास शासनाने १० लाख रुपये मदत द्यावी, त्यांच्या कुटुंबातील एकास शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी माजी खा. हरिभाऊ राठोड, आ. राजेश राठोड, यांच्यासह बंजारा समाजाचे पदाधिकारी मोर्चात जिल्ह्यातील लाखो महिला,तरूण, लहान बालके, आबालवृद्ध समाज बांधव पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले.

## क्षणचित्रे

- आरक्षणासाठी बंजारा समाज एकवटला
- अडीच तास अंबड चौफुली जाम
- वाहनांच्या लांबच लांब रांगा
- रिमझिम पावसात समाजबांधवांचा प्रचंड उत्साह
- पारंपरिक वेशात महिलांचा लक्षणीय सहभाग
- संस्था ,संघटनांतर्फे मोर्चे कऱ्यांना पाणी- चहाची व्यवस्था
- ५०० युवक- युवती स्वयंसेवक
- पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त

## सर्व स्तरातून पाठिंबा...!

बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चात अंबड चौफुली येथे सभास्थळी मराठा समाजातील संघटना, धनगर समाज , भगवान सेवा संघ,कैकाडी समाज, जोशी- यज्ञेकर समाज, मजदूर संघ सह विविध संस्था, संघटनांनी पाठिंबा दिला.

## पोलिसांचा मोठा फौज फाटा...!

मोर्चासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेत मोठा फौज फाटा तैनात केला. उपविभागीय पोलीस अधिकारी हे स्वतः देखरेख अधिकारी म्हणून होते . ०७ पोलीस निरीक्षक, २७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, २७२ पोलीस अंमलदार, या सोबतच ०२ दंगा नियंत्रण पथकातील ६४ कर्मचारी असा मोठा लवाजमा तैनात करण्यात आला. स्वयंसेवकांनी प्रत्येक चौकात वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीसांना मदत केली.

# लंकाबाई बिलघे यांच्या घरावर हल्ला

### ३५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल
### पोलीस तत्काळ घटनेस्थळी दाखल





जालना । प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील जवखेडा ठोंबरे येथे १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता लंकाबाई सरदार बिलघे यांच्या घरावर शेकडो जणांच्या जमावाने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. लंकाबाई यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांच्या पुतण्याचा पवन बिलघे याचा केदारखेडा येथे भुसार मालाचा व्यवसाय होता. शेतकऱ्यांचे काही पैसे बाकी राहिल्याने त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत व तो सध्या तुरुंगात आहे. या कारणावरून गावातील बाबासाहेब सखाराम वराडे व पप्पु उर्फ भास्कर सांडु ठोबरे यांनी गावातील ३५ जण व इतर ८० ते ९० लोकांना एकत्र करून लंकाबाई यांच्या घरावर हल्ला केला. सदरील ठिकाणी पोलीस तत्काळ दाखल होऊन लोकाविरुद्ध गुन्हे दाखल केले याप्रकरणी कोणीही कायदा हातात घेऊ नये. जे अजून कोणी दोषी असतील त्यांच्या विरोधात पण गुन्हे दाखल करण्यात येईल असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले. या घटनेमध्ये पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठी घटना टळली.

हल्लेखोरांनी घराचे गेट मोडले, खिडक्यांवर दगडफेक केली, कॅमेऱ्यांची तोडफोड केली, लाकडांचे ओंडके घरावर फेकले व घरात घुसून महिलांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यावेळी लंकाबाईंची गरोदर मुलगी उपस्थित होती तरीदेखील आरोपींनी निर्दयीपणे धमक्या दिल्या. या प्रकरणी लंकाबाई यांनी नमूद केलेली प्रमुख नावे अशी आहेत. बाबासाहेब सखाराम वराडे, पप्पु उर्फ भास्कर सांडु ठोबरे, रमेश एकनाथ ठोबरे, उमेश गुरजुराम ठोबरे, गणपत दादाराव ठोबरे, गणपत हिम्मताव ठोबरे, नारायण ठोबरे, संजु ठोबरे, रामेश्वर फकिरबा ठोबरे, बाबासाहेब माधवराव ठोबरे, विजय सर्जेराव ठोबरे, परमेश्वर ठोबरे, शरद ठोबरे, संजु रामकिसन ठोबरे, सुभाष ठोबरे, आकाश राजु आढावे, वनिता गिरजुराम ठोबरे, राधाबाई रमेश ठोबरे, जगदीश भगवान ठोबरे, अशोक ठोबरे, श्रीराम सोरमारे, गंगाधर काळे, भाऊसाहेब घोडे, परमेश्वर सुभाष ठोबरे, विजय सर्जेराव ठोबरे, संजु रामकिसन ठोबरे, रामेश्वर फकिरबा ठोबरे, पांडुरंग बाजीराव पडोळ, डिगांबर कडुबा वाघ, लक्ष्मीबाई विजय वाघ, पंढरीनाथ शेनफड तांबडे, गौतम शामराव राऊत, गोविंदराव विठोरा बकाल, श्रीमंता हिम्मतराव लोखंडे, दत्तात्रय साहेबराव ठोबरे याशिवाय अन्य ८०-९० लोकांवरही गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती प्राप्त होत आहे .

या घटनेत गावातील वाळू तस्कर व समाजकंटकांचा मोटा सहभाग असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी भोकरदन पोलिस ठाण्यात दंगल, मारहाण, तोडफोड, जीवे मारण्याची धमकी, सरकारी आदेशाचा भंग आदी गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करत असून गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४१२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २१/०७/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) कमल कैलास राठोड सर्व्हे नं. ९९ सहन प्लॉट नं.२९ सिटी स्वर्हे नं. २४७६ न.प.मि.न. १८-१३६-२९ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१३६-२९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नंबर ४२न.प.घर नंबर १८-१३६-४२ मधील भाग
पश्चिम : १३ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- १५ मिटर रुंदीचा बोरी सरकारी दवाखाना रोड
उत्तरः प्लॉट नंबर २९ मधील उर्वरित भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५३२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १०/०९/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शारदा राम भवर सर्व्हे नं. ४५१ सहन प्लॉट नं.१९ नं.प.मि.नं.१८-१८०-१९ व प्लॉट नंबर २० न.प.मि.न. १८-१८०-२० चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१८०-१९,१८-१८०-२० ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नंबर १८
पश्चिम : ओपन स्पेस
दक्षिण- सर्व्हे नं. ४५१ मधील लेआउट
उत्तरः ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

**जाहीर प्रगटन**

### मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १४१५/२०२५**
CNR No. MHBI020000300072025

**अशोक पि. पापालालजी चांडक वि. निरंक**
**(मार्फत ॲड. आर. आर. शिंदे)**

अर्जदार : अशोक पि. पापालालजी चांडक, वय ५७ वर्षे, धंदा- व्यापार, रा. लोणी शहाजानपूर, पो. नाथापुर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत पार्वती पापालालजी चांडक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत पार्वती पापालालजी चांडक यांचा मृत्यु दिनांक १२/०६/२०२५ रोजी विप्र नगर बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे. मयताचे पती नामे पापालाल बालकिसन चांडक हे दिनांक १५.१०.२०१६ रोजी मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत पार्वती पापालालजी चांडक यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'राज्य लोकतंत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १६/१०/२०२५ आज दिनांक १६ माहे सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
**क.लिपिक**

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

---

### कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

PH no02483-271787
npghansawangi@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२२००२६
जा.क्रं. २०२५/नपघ/जा.प्र./कावी- १७४६
दिनांक:-१५/०९/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रमेश कठाळु दशरथ रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे रामेश्वर अन्नासाहेब कानकाटे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १८३५ दि. ०६/०६/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २६७६ दिनांक:- १६/०९/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. रामेश्वर अन्नासाहेब कानकाटे रा. ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (- ) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. ११७ मधील क्षेत्र १००.३७ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे. पुर्व :- अंतर्गत रस्ता, पश्चिम :- त्रिंबक गणपत तेलंग यांची जागा, दक्षिण :- सरकारी रस्ता, उत्तरेस :- शहाजी आसाराम देशमुख यांची जागा या वरील चतुःसिमा मधील १००.३७ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

---

### कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

PH no02483-271787
npghansawangi@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२२००२६
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१७४४
दिनांक:-१६/०९/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार रामेश्वर उध्दवराव उगले रा. देवहीवरा ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे १. बबिता विमलराज जैन २. विक्की विमलराज जैन ३. निखिल विमलराज जैन रा. ता. जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २६८२ दि. ०४/०९/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२६५६) दिनांक. १२/०९/२०२५ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बबिता विमलराज जैन २. विक्की विमलराज जैन ३. निखिल विमलराज जैन रा. ता. जि. जालना नावावर असलेला गट नं. (२०३) सिटी सर्वे नं. ७२७/२७ मधील प्लॉट नं. २७ मधील क्षेत्र १३९.०१ चौ.मी जागा ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. २८, पश्चिम :- ९ मीटर रोड
दक्षिण :- ९ मीटर रोड, उत्तर :- प्लॉट नं. २६

या वरील चतुःसिमा मधील प्लॉटचे क्षेत्र १३९.०१ चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

---

## केंद्रने जीएसटी मध्ये बदल केल्यामुळे नागरीकांना दिलासा-आ.कुचे

जालना। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार मधील अर्थ मंत्रालयाने जीएसटी मध्ये बदल करुन सर्वसामान्य नागरीकांना दिलासा देण्याचे काम केल्याचे मत भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे यांनी सोमवार दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय,जालना येथे आयोजीत पत्रकार परिषद मध्ये केले.यावेळी पत्रकार परिषदेमध्ये बोलतांना आ.कुचे म्हणाले की, केंद्र सरकारने दैनंदिन घरगुती व शेतीच्या वस्तु वरील जीएसटी दर कमी करुन तसेच अन्नपदार्थ व आरोग्य व विमा घरगुती खर्च कमी होणेसाबण, शैम्पू, टूथपेस्ट इत्यादी वस्तू स्वस्त होतील. जे लोक दररोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे उत्पादने घेतात त्यांना बचत होईल. तसेच अन्नपदार्थ आणि आरोग्यब्रेड, दूध, पनीर इत्यादी मूलभूत अन्नपदार्थांवर कमी किंवा शून्य होईल अन्नाची किंमत कमी होण्याची होणार आहे. याशिवाय जीवन विमा व आरोग्य विमा कमी कारहित / कमी दर मिळण्याने महागपणा कमी होईल. गृहघटांची / इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त होणेटीव्ही, एसी, छोटे उपकरणे यांवर आधीपेक्षा कमी कर लागणार असल्यामुळे उत्पादनांची किंमत कमी होईल जेव्हा मार्केटमध्ये मागणी वाढू शकते आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होतील.

गाड्या / वाहन खरेदी स्वस्त होणे लहान गाड्या व २-व्हीलर्सवर कमी कर लागणार असल्यामुळे त्यांची किंमत कमी होईल असेही आ.नारायणराव कुचे म्हणाले की यावेळी भाजपा जालना महानगर अध्यक्ष भास्करराव दानवे म्हणाले की, केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी अनेक योजना आहेत त्या योजनेचा सर्वसामान्य जनतेने लाभ घ्यावा व केंद्र सरकारने जीएसटीमध्ये अनेक बदल केल्यामुळे त्यामध्ये नवीन वाहन घेण्याचा खर्च कमी होण्याची अपेक्षा आहे तसेच शेती व कृषी खर्च कमी होणे ट्रॅक्टर, उपकरणे, सिंचन यंत्रणा, टायर्स यांसारख्या कृषी- उत्पादनाच्या बाबतीत खर्च कमी होणार म्हणजे शेतकऱ्यांचा उत्पन्न भाग वाढू शकतो. मध्यम-वर्ग व कमी उत्पन्न गटांवरील ताण कमी करणे जे लोक हलक्या बजेटमध्ये राहतात, त्यांचे खर्च फारसा कर वाढीस कारणीभूत बनायचा नाही, या सुधारणांमुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल.

---

**जाहिर प्रगटन**

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-४३७**
**दिनांक -२९/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मच्छिंद्र रामराव जाधव रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगाच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | देवांश मच्छिंद्र जाधव | मुलगा | ०१/०६/२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

### कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

PH no02483-271787 दूरध्वनी क्रमांक ०२४८३२२००२६
npghansawangi@gmail.com
जा.क्र. २०२५/नपघ/जा.प्र./कावी- १७४५
दिनांक:- ११/०९/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार उध्दव बन्सी उगले रा. देवहीवरा ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे १. बबिता विमलराज जैन २. विक्की विमलराज जैन ३. निखिल विमलराज जैन रा. ता. जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २६८० दि. ०४/०९/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं (२६५५) दिनांक. १२/०९/२०२५ रोजी नोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बबिता विमलराज जैन २. विक्की विमलराज जैन ३. निखिल विमलराज जैन रा. ता. जि. जालना नावावर असलेला गट नं. (२०३) सिटी सर्वे नं. ७२७/२६ मधील प्लॉट नं. २६ मधील क्षेत्र १५५.६५ चौ.मी जागा ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं. २५, पश्चिम :- ९ मीटर रोड
दक्षिण :- प्लॉट नं. २७, उत्तर :- ९ मीटर रोड

या वरील चतुःसिमा मधील प्लॉटचे क्षेत्र १५५.६५ चौ.मी. जागा खरेदीदस्ता आधारे नोंद करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नोंद साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नोंद कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी

---

## आ. रोहित पवार घेणार कर्जत-जामखेड पंचायत समित्यांच्या वार्षिक आमसभा

### शासकीय कामकाज, विकासकामांचा आढावा आणि नियोजनाला मिळणार गती



जामखेड। प्रतिनिधी

कर्जत-जामखेड मतदारसंघातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांतील प्रलंबित तसेच सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी आमदार रोहितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत आणि जामखेड पंचायत समित्यांच्या वार्षिक आमसभा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये मतदारसंघातील विविध सरकारी कार्यालयांच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात येणार आहे. या दोन्ही आमसभांमध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या व सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून, २०२५-२६ या वर्षासाठी करावयाच्या नव्या योजनांचे नियोजन निश्चित केले जाणार आहे. यामध्ये ग्रामविकास, शेतीसंबंधित उपक्रम, पायाभूत सुविधा उभारणी, शिक्षण व आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे यासह सध्या सुरु असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच शासकीय कामकाजाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांचाही आढावा घेण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत झालेल्या नसल्याने या दोन्ही पंचायत समित्यांचे कामकाज प्रशासक म्हणून बीडीओ यांच्याकडे देण्यात आलेले आहे. त्यामुळे विकास कामांचा आढावा घेणे आणि प्रत्येक शासकीय कार्यालयात नागरिकांच्या अडकलेल्या कामांचा निपटारा करणे यासाठी या आमसभांना मोठे महत्त्व आहे. या आमसभेला थेट आमदार स्वतः उपस्थित राहणार असल्याने प्रशासनाकडून आमसभेची जोरदार तयारी करण्यात आली आहे. नागरिकांच्याही अडकलेल्या प्रश्नांवर या आमसभेत चर्चा होऊन ते सोडवण्यास मदत होणार आहे. या सभांमध्ये संबंधित विभागाचे अधिकारी, पंचायत समितीचे मा. सदस्य, स्थानिक पदाधिकारी व नागरिक सहभागी होणार आहेत. कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी आणि जामखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव यांनी सर्व संबंधित सदस्य, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून रचनात्मक सूचना व मते नोंदवावीत, असे आवाहन केले आहे.कर्जत पंचायत समितीची आमसभा गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवपार्वती मंगल कार्यालय, कर्जत जामखेड पंचायत समितीची आमसभा शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राज लॉन्स, जामखेड येथे होणार आहे

# आष्टी-शिरूर तालुक्यातील पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करा-आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी व शिरूर तालुक्यामध्ये नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी आष्टी तहसिल कार्यालयात तातडीची बैठक घेऊन अतिवृष्टीमुळे पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यासंबंधी महत्त्वपूर्ण सूचना जिल्हा प्रशासनास दिल्या आहेत.**

गेल्या दोन-तीन दिवसापासून झालेल्या जोरदार पावसामुळे आष्टी व शिरूर (कासार) तालुक्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा तसेच उपाययोजना करण्याबाबत स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना मदतीबाबत अस्वस्थ करून नद्यांना आलेल्या अचानक पुरामुळे अडकलेल्या लोकांना त्यातून बाहेर काढून दि.१६ रोजीच रात्री ७ वा.आष्टी तहसिल कार्यालयात प्रशासनाची बैठक घेतली..या बैठकीस उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते..

या बैठकीत आ.सुरेश धस म्हणाले, अनेक गावांत नदी नाल्याचे पाणी घरात शिरल्यामुळे घरांची पडझड झाली असून नदीकाठच्या जमीनी खरडून गेल्या आहेत.. त्याबाबत तात्काळ पंचनामे करावेत..ज्या गावातील पूलावर पाणी जाऊन गावांचा संपर्क तुटला आहे तेथील नागरिकांना पुलावरून जाऊ नये,असे आवाहन करावे तसेच पुलांच्या तात्काळ दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर करावेत..



आष्टी तालुक्यांतील पाझर तलाव, साठवण तलाव,सिंचन तलाव, पूर्ण क्षमतेने भरून जात आहेत.काही तलाव फुटले आहेत तसेच काही तलावातील पाणी सांडवा फोडून काढून देण्यात आले आहेत.सदरील तलावांच्या दुरुस्तीचा,पडझड झालेल्या कोल्हापुरी बंधारे व सिमेंट नाला तसेच जिल्हा परिषद शाळेमध्ये पाणी जाऊन शाळेचे नुकसान झालेले आहे,अशा शाळांचे दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करावे व शाळेची इमारत धोकादायक असल्यास वर्ग इतरत्र भरवण्यात यावेत.गावा गावांना जोडणारे रस्ते पावसामुळे खचल्यामुळे गावांचा संपर्क तुटला आहे. त्या रस्ते दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करावा.अनेक गावांतील घरामध्ये पाणी जाऊन नागरिकांचे नुकसान झाले आहे अशा नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करून त्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी.पोल पडल्यामुळे व तार तुटल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला आहे अशा गावांमध्ये तात्काळ विद्युत पुरवठा चालू करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

बंद असलेल्या बसेस चालू करून नागरिकांची गैरसोय दूर करावी.नाल्या जेसीबीव्दारे खुल्या करून पाणी काढून देणे व नाल्या दुरुस्ती कराव्यात शहरातील गटारी तुंबल्यामुळे पाणी शहरातील मुख्य रस्त्यांवर आले आहे. या गटारी जेसीबीव्दारे खुल्या करण्यात याव्यात. अतिवृष्टीमुळे रोगराई (डेंगू मलेरिया) पसरण्याची भीती आहे.तरी नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना कराव्यात सर्व विभागाच्या एकत्रित नुकसानीचा मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी बीड यांनी शासनाकडे तत्काळ सादर करावा,अशी सूचना देखील आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

## पुरातील नुकसानग्रस्तांचे पंचनामे करून तात्काळ मदत द्या -मनोज जरांगे पाटील

आष्टी । प्रतिनिधी

कडा व परिसरामध्ये गेल्या दोन दिवसापूर्वी आलेल्या पुरामुळे शेतकरी व व्यावसायिकांचे अतोनात असे नुकसान झाले असून त्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून तात्काळ मदत देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. मनोज दादा जरांगे पाटील यांनी मंगळवारी आष्टी तालुक्यातील नुकसानग्रस्तांची पाहणी करताना ते बोलत होते.



आष्टी तालुक्यातील धामणगाव ,घाटा ,पिंपरी दादेगाव ,डोंगरगण ,टाकळी ,कडा,शिराळ टाकळसिंग ,हिंगणी येथील पूरग्रस्तांच्या व्यथा मनोज जरांगे पाटील यांनी ऐकून घेतल्या.यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की,पंचनामे करताना शेतकऱ्यांचे सरसकट नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ शासनास अहवाल सादर करावा .शासनाकडून

◀◀ पान २ वर



## चौसाळा महसूल मंडळात पिकाचे ८० ते ९० टक्के नुकसान

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा महसूल मंडळा अंतर्गत झालेल्या पावसामुळे अतिवृष्टीने पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्याकरिता चौसाळा तलाठी कार्यालयाचे तलाठी कमलेश निर्मळ यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली व पाण्यातील पिकांचे फोटो काढले.

यामध्ये सोयाबीन,ऊस, तुरीचे, नुकसान झालेले पाहून तहसील कार्यालयाला ऑनलाइन माहिती कळविली.

यावेळी शेतकरी व ग्रामस्थांकडून तात्काळ पंचनामे करण्याची मागणी करण्यात आली. चौसाळा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन

◀◀ पान २ वर

## माजलगाव धरणातून सिंदफणा नदीपात्रात ८५ हाजार क्युसेक्सने विसर्ग

### सांडस चिंचोली गावाला पुराच्या पाण्याचा वेढा,आले बेटाचे स्वरुप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सांडस चिंचोली या दिड हजार लोकवस्तीच्या गावास खेटून सिंदफणा नदी वाहते व ती पुढे जाऊन मंजरथ येथील गोदावरी नदीस मिळते. सध्या माजलगाव धरणातून सिंदफणा नदी पात्रात ८५ हजार क्युसेसने विसर्ग सुरू असल्याने सिंदफाना नदीपात्र काठोकाठ भरून वाहत आहे.तसेच गोदावरी नदीदेखील तुडुंब भरून वाहत असल्याने, जायकवाडी धरणातून गोदावरी नदीपात्रात

◀◀ पान २ वर

**माजलगांव धरण पाणलोट क्षेत्रातील आजचे पर्जन्यमान**


१) नवगण राजुरी. ७३.०० , २) रायमोहा.२०.००
३) ब्रम्हनाथ येळंब. २२.००, ४) मानूर. ११३.००
५) अमळनेर.२५.०० ६) जवळाला. ६२.००
७) मादळमोही ५९.०० ८) नांदलगाव ५६.००
९) पिंपळनेर. १६०.०० १०) चिंचवन ३५.००
११) दहिफळ. ३०.०० १२) केसापुरी कॅम्प. ६५.००



## कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका, ग्रामस्थांना धोका होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात -आ.क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



बीड विधानसभा क्षेत्रातील मौजे कपिलधार ग्रामपंचायत पाली अंतर्गत येत आहे. सदरील गाव हे डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. तसेच त्याच्या बाजूला कपिलधार हे तीर्थक्षेत्र हे ठिकाण आहे. याठिकाणी हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात.मात्र या ठिकाणी भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून संरक्षण भिंत पूल देखील कोसळली आहे. याबाबतीत आ. संदीप क्षीरसागर यांनी वारंवार शासनाकडे पत्र व्यवहार करून उपाययोजना करण्याची मागणी केली होती. १३ सप्टेंबर पासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे संरक्षण भिंत देखील

◀◀ पान २ वर

### बीड, शिरूर (का),वासनवाडी येथे तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या

वासनवाडी ता.बीड येथील गाव तलाव फुटला असून परिसरातील ग्रामस्थांनी खबरदारी घ्यावी. तसेच बीड व शिरूर (का) तालुक्यातील नदी पात्रावरील रहदारी योग्य असणारा पुल वाहुन गेलेले आहेत. त्या बाबतीत तातडीने उपया योजना बाबत प्रशासनास सूचना केल्या आहेत.

## पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात मुसळधार पावसाने नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले



पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी-अंमळनेर-कोतन तसेच खोपटी-पांगरी-भडकेल परिसरात शनिवार,रविवार व सोमवार सकाळी ३ दिवस (रात्र-दिवस) मुसळधार पावसाने नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले असून नदी नाल्यांना महापूर आल्याने अनेक ठिकाणी पुराच्या पाण्यात पिके वाहून जाऊन उभ्या पिकात पाणी साचल्याने शेताला तळ्याचे स्वरूप आल्याचे चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे. यामुळे परिसरातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.रविवार, सोमवार रोजी झालेल्या पावसाचा जोर इतका होता की,कांदा,कापूस, सोयाबीन आदीसह फळबागाही पावसाने झोडपून काढल्या.काढणीला आलेले सोयाबीन अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे.

### लहान-मोठे तलाव ओव्हरफ्लो उभे पिके पाण्यात

सोमवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसाने पिंपळवंडी जवळून वाहणाऱ्या नदीला महापूर आल्याने गावात जा-ये करण्यासाठी पुलाच्या वरून अंदाजे ३-४ फुटाच्या वर पाणी वहात आसल्याने दुपारी १ वाजेपर्यंत गावातील व गावाच्या बाहेर राहणाऱ्या लोकांचा संपर्क तुटला होता.पुलावरील पाणी कमी झाल्यानंतर पुलावरून वाहतूक पूर्ववत सुरू झाली.या नदीवर कमानीचा पूल बांधावा अशी अनेक वर्षांपासून ग्रामस्थांची मागणी आहे. पण यासाठी शासन ना पुढारी पुढाकार घेत नसल्याची गावकरी खंत व्यक्त करीत आहे.

## खाजगी वाहनास रेल्वे स्टेशन परिसरात मज्ञाव

### शहरातून कार्यक्रम स्थळी जाण्यासाठी मिनी बसेसची व्यवस्था

बीड । प्रतिनिधी

दिनांक १७/०९/२०२५ रोजी बीड ते अहील्यानगर रेल्वे उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. उद्घाटनाचा मुख्य कार्यक्रम धानोरा रोड, बीड रेल्वे स्टेशन येथे होणार आहे. सदर कार्यक्रमासाठी बीड जिल्?ह्यातील विविध पक्षाचे पदाधीकारी मान्यवर तसेच नागरीक येणार आहेत.

बीड जिल्हा तसेच परीसरात मागील ३ दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे व अजूनही पाऊस चालू आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशन परीसरात प्रशासनाने नागरीकांसाठी तयार केलेल्या पार्कींग मध्ये तसेच शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसामुळे चिखल झाला आहे.

कार्यक्रम स्थळी नागरीकांसाठी तयार केलेल्या पार्कंगमध्ये नागरीकांनी वाहने घेवुन गेल्यास त्याठिकाणी वाहने चिखलात फसून नागरीकांची गैरसोय होवू शकते. तसेच सदरचा रस्ता अरुंद असल्याने येणारे नागरीकांना कार्यक्रमस्थळी पोहचण्यासाठी अडचण निर्माण होवून गैरसोय होवू शकते.त्यामुळे नागरीकांना जिल्हा प्रशासान व पोलीस प्रशासनाकडून आवाहन करण्यात येते की, बीड शहराच्या बाहेरुन येणाऱ्या नागरीकांसाठी जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व उपप्रादेशीक परीवहन विभागी बीड यांच्या नियोजनाद्वारे बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण, जिल्हा परीषद कार्यालय बीड, चंपावती क्रिडांगण बीड येथे पार्कंगचे स्लॉट करण्यात आले

◀◀ पान २ वर

## तात्काळ मदत जाहीर करा - प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

मागील चार-पाच दिवसापासून जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे त्यामुळे शासनाने विलंब न करता स्पॉट पंचनामे सुरू करावेत व शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करून शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे



जिल्ह्यामध्ये श्रावण महिन्यातच संततधार व अतिवृष्टी झाली होती त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यात पुन्हा परतीच्या पावसाने पूर्ण जिल्ह्यामध्ये पावसाने पिके झोडपली आहेत जिल्ह्यामध्ये गोदावरी बिंदुसरा अशाअनेक नद्या दुतर्फा वाहू लागल्यामुळे उभ्या पिकामध्ये शेतात पाणी गेले आहे त्यामुळे कापसाचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे गेल्या दोन दिवसात पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे त्यामुळे शेतकरी पूर्ण पणे खचला असून केलेला खर्च तरी निघतो

◀◀ पान २ वर

## दोन दिवसांच्या पावसाने नदीला पूर आल्याने शेतकऱ्यांवर संकट

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळदार पावसामुळे नदीला पूर आल्याने उपळी येथील शेतकरी शेख जुबेद यांचा व इतर शेतकऱ्यांचा शेत वाहून गेल्याच प्रकार घडला व त्याव्यतिरिक शेतात असलेल्या उभ्या कापसाचे पीक हे पावसाच्या व वाऱ्याच्या जोरदार फटक्याने शेतकऱ्यांचे कापूस पिक जमिनीवर पडले असून शेतकरी संकटात सापडले आहेत. या वर्षी पाऊस चांगला झाल्याने कापसाचे पीक हे चांगले



आले असताना पुन्हा ह्या दोन दिवसांच्या पावसाने पुन्हा शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले असून येथील शेतकऱ्याने प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.शेतकरी म्हणतात, ''संपूर्ण वर्षभर कष्ट करून उभा केलेला कापूस अवकाळी पावसामुळे वाया जात असल्याने हाती काहीच राहत नाही. सरकारने तातडीने मदतीची घोषणा करावी.''ग्रामीण भागात यामुळे हताशा पसरली असून शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत आहे.

## बीड जिल्हा राज्यात नंबर एक वर; जिह्यातील १७१५३ घरकुले पूर्ण

### जियो टॅग करण्यासाठी अभियंतांनी गावात ठाण मांडले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात चालु वर्षात १७१५३ घरे पूर्ण झाली आहेत. राज्यात बीड जिल्हा सद्यस्थितीत टॉपवर आहे. घरकुलाच्या कामाची गती वाढविण्यासाठी जियो टॅग करण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना गावात पाठविण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिवाळीपर्यंत घोषित केल्या प्रमाणे लाभार्थीची दिवाळी नव्या घरात साजरी व्हावी, यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात आहेत.





बीड जिल्ह्यासाठी घरकुलाचे एकूण भौतिक उद्दिष्ट १,७११५८ एवढे आहे. त्यापैकी १,६३,५३२ घरकुलांना मंजुरी मिळालेली आहे. १,४६२३६ घरकुलांना पाहिला होता मिळाला आहे. तर ६९,५६० घरकुलांना दुसरा हप्ता मिळाला आहे. आतापर्यंत बीड जिल्ह्यातील १७१५३ घरकुल पूर्ण झाली आहेत. गेल्या आठवड्यात गोंदिया जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर होता तर या आठवड्यात कामांची प्रगती वाढल्याने बीड जिल्ह्याने प्रथम क्रमांकावर आहे.

दरम्यान घरकुलाच्या कामे प्रगतीपदावर असताना कुणाचेही मस्टर अडवू नका. विहित कालावधीत लाभार्थ्यांना हप्ता मिळेल या संदर्भात कार्यवाही करावी, असे स्पष्ट आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान आणि प्रकल्प

◀◀ पान २ वर

### घरकुलाची तालुकानिहाय पूर्ण घरकुलांची संख्या पुढील प्रमाणे आहे

| | |
|---|---|
| अंबाजोगाई - | १९४६ (१५३३४) |
| आष्टी - | १७०६ (१६६६७) |
| बीड - | २२०३ (२४४१४) |
| धारूर | १४४३ (१०४६८) |
| गेवराई - | १४५२ (२९००५) |
| केज- | १९२१ (२२१४२) |
| माजलगाव- | १२५५ (१७६२४) |
| परळी- | २१०२ (११९२९) |
| पाटोदा- | ११२१ (९७५३) |
| शिरूर (का.)- | ९८६ ( ८२१५) |
| वडवणी- | १०१७ (५५९८) |




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष



# ‘एनएचएम’ मधील अधिकारी कर्मचाऱ्यांना कोट्यावधींचा गंडा; नोकरीत कायम करण्याच्या नावाखाली उकळले ७५ कोटी

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षांहून अधिक वर्षे राज्याच्या आरोग्य विभागात कंत्राटी तत्त्वावर काम करणारे ‘राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) मधील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत कायम करण्यासाठी ‘वर’ पर्यंत ‘रसद’ पुरवावी लागेल सांगत राज्यभरातून जवळपास दोन ते अडीच हजार कर्मचाऱ्यांकडून ७० ते ७५ कोटी रुपये रोख स्वरूपात घेतल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये सूरू आहे.

विशेष म्हणजे हे पैसे ‘एनएचएम’ मध्ये काम करणाऱ्या १३ कर्मचारी व अधिकारी यांनीच गोळा केला असल्याचा संदेश त्यांच्या नावासहित व रकमेच्या आकड्यासहित समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. इतके पैसे देऊनही काम न झाल्याने हे पैसे परत करावेत अशी मागणी आता कर्मचारी करू लागले आहेत. आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेसह प्रसूती, नवजात कक्ष, अतिदक्षता विभाग, लसीकरण, औषध, वितरण यांसह तांत्रिक व अतांत्रिक विभागात डॉक्टर, परिचारिका, औषध निर्माण



अधिकारी, तंत्रज्ञ असे वर्ग एक पासून वर्ग चार पर्यंतची ६९ संवर्गातील सुमारे ३५ हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत.

सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठीच या कर्मचाऱ्यांनी गेल्या महिन्यात १७ दिवस राज्यव्यापी कामबंद आंदोलन केले होते. पैसे देऊनही सेवेत कायम न झाल्याची माहिती काही कर्मचारी यांनी खासगीत दिली. याबाबत मात्र, समोर येऊन उघडपणे कोणीही बोलायला तयार नाही.

हा प्रकार दीड वर्षापूर्वी गेल्या वेळच्या महाविकास आघाडीचे सरकार असताना सूरू झाला. ज्यांची दहा वर्षांहून जास्त झाली आहे त्यांना सेवेत कायम करण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पहिला हप्ता हा ७५ हजारांचा घेतला. प्रत्येक जिल्हयात एका व्यक्तीकडे हे पैसे गोळा केले गेले. हे पैसे मंत्रालयात द्यायचे आहेत, जे पैसे देतील त्यांचेच नावे वरपर्यंत जातील व ते नोकरीत कायम होतील असे सांगितले गेले. दरम्यान, मार्च २०२४ रोजी १० वर्षांहून अधिक काळ सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, असा शासन निर्णय प्रसिद्ध झाला व हे पैसे दिल्यानेच तो आल्याचे त्यांनी सांगून आता नावांची यादी येणार असल्याचे सांगत पुन्हा ७५ हजार गोळा केले. मात्र, अद्यापही कोणीही सेवेत कायम झालेले नसल्याने पैसे देणारे कर्मचारी अस्वस्थ झाले आहेत.

हे पैसे गोळा करण्यासाठी खास ‘आयएचएन’ असा कोड दिला गेला आहे. ज्या तेरा जणांकडे हे पैसे आहेत त्यांचा हिशोब हा ७५ कोटी इतका होत आहे. प्रत्येकी १ कोटी पासून १६ कोटी रुपयांपर्यंत ही रक्कमेचा हिशोब जात आहे. कोणी दागिने गहाण ठेवून तर कोणी उसने घेउन हे पैसे भरल्याने कर्मचारी आता हे पैसे परत मिळावे यासाठी पोलिसांत जाण्याची तयारी करत असल्याचे व्हायरल झालेल्या संदेशावरून दिसून येते.

# लिखाण करुन-करुन माझे हात वाकडे झाले; कमी बुद्धी म्हटलेल्या व्हायरल व्हिडिओवरही विश्वास पाटलांचं स्पष्टीकरण

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराजांवरील संभाजी ही कादंबरी मी घरा घरात पोहोचवली आहे. लिखाण करुन करुन माझे हात वाकडे झाले आहेत, असे वक्तव्य अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील (तळीहुरी झरींळश्र ) यांनी केलं. पुण्यात आयोजीत करण्यात आलेल्या सत्कार समारंभात ते बोलत होते. मी जातीवर बोललो नव्हतो. मी संभाजीराजे मद्य सेवन करत होते असं कधीही म्हटलं नाही असे विश्वास पाटील म्हणाले. त्यावर मी वीडियो पण बनवला आहे मी असं काहीही म्हटलं नसल्याचे स्पष्टीकरण विश्वास पाटील यांनी दिले.



संभाजी कादंबरी मी घरा घरात पोहोचवल्याचे मत विश्वास पाटील यांनी व्यक्त केले. लिखाण करुन करून माझे हात वाकडे झाले आहेत असेही ते म्हणाले. आज मला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला आहे. आमचे गुरु प्र के अत्रे असतील अशा लोकांच्या गादीवर बसण्याचा मान मिळाला. मला आवडलेली लस्ट फॉर लालबाग ही कादंबरी आहे. मी आतापर्यंत २५ वर्ष झालं लिहीत आलो आहे असे विश्वास पाटील म्हणाले.

मी वारणा काठचा पण वारणा काठचेच काही लोक माझी बदनामी करतायेत मी सर्व प्रकारचे साहित्य लिहले आहे. लोकप्रिय साहित्य लिहले हा आरोप चुकीचा आहे. मी अण्णाभाऊ साठेंवर देखील लिहीलेले आहे. माझे आरक्षणाबद्दलचे वक्तव्य विपर्यास करुन दाखवण्यात आले आहे. मी आरक्षण विरोधी नाही असेही विश्वास पाटील म्हणाले. हैदराबाद गॅझेटचा आरक्षण देताना संदर्भासाठी उपयोग केला जायला हवा. माझ्यावर झालेले आरोप खोटे आहेत. मी लस्ट फॉर लालबाग ही कादंबरी लिहली. त्यातून दुखावलेल्या माफियांनी माझ्या कुटुंबीयांना हाताशी धरुन बदनामी केली. बदनामी करणाऱ्यांना आव्हान आहे की तो लेख पुन्हा छापावा. मी वारणा काठचा आहे. पण वारणा काठचेच काही लोक माझी बदनामी करत असल्याचे विश्वास पाटील म्हणाले. मला कोणी डावं उजवं शिकवू नये. मी पण डावा आहे. मी पाटलाचा पोर आहे, घाबरत नाही, लढायला तयार आहे असे विश्वास पाटील म्हणाले.

पुण्यात अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. यावेली त बोलत होते. पुण्यातील साहित्य परिषदेच्या सभागृहात त्यांचा सत्कार समारंभ पार पडला. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे आणि साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ सोहळा संपन्न होत आहे.

# कौशल्य विकासातूनच भारत आत्मनिर्भर बनेल...; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे पुण्यामध्ये आले होते. फ्यूएलचा पहिला दीक्षांत समारंभ संपन्न झाला असून यामध्ये ते सहभागी झाले. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, देशात सर्वात मोठी समस्या रोजगार निर्मितीची आहे. अशा वेळेस सीएसआरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हे अद्वितीय कार्य असून फ्यूएल यशस्वीपणे पार पाडीत आहे. यामुळे युवकांचे जीवन बदलून भारत आत्मनिर्भरतेकडे उंच भरारी घेत आहे. असे विचार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

शिक्षण, कौशल्य विकास व रोजगारक्षमतेसाठी कार्यरत फ्यूएल शिक्षण संस्था समूहच्या फ्यूएल बिझनेस स्कूलचा पहिल्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. तसेच वन व्हिजन, वन मिशन आणि स्किल्ड नेशन या तत्वांवर आधारित फ्यूएलचा १९ वा वर्धापन दिवस भूगाव येथील संस्थेत उत्साहात साजरा झाला.



या वर्षी २०० विद्यार्थ्यांना सीएसआर शिष्यवृत्ती व डिग्री प्रदान करण्यात आली. यावेळी फ्यूएल शिक्षण संस्था समूहाचे अध्यक्ष व सीईओ डॉ. केतन देशपांडे, चीफ मेंटॉर संतोष हुर्लेकोप्पी, फ्यूएलच्या सीओओ मयूरी देशपांडे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नितीन गडकरी यांच्या हस्ते फ्यूएल बिझनेस स्कूलमध्ये पीजीडीएम (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स) अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच फ्यूएल आणि कॅपजेमिनीमध्ये एमओयू करण्यात आला. तसेच सीएसआरमध्ये कार्यरत व्यक्तींना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम लीडरशिप अवॉर्ड प्रदान करण्यात आला. यामध्ये सुदिप्ता पॉल, वामशी मुथ्थापू, सुमीत शहा, रेखा पिल्ले, रिया वैद्य, धनश्री पागे, बिना बलदोटा, शिल्पाश्री, अर्पणा पांडे यांचा समावेश आहे.

यावेळी नितीन गडकरी म्हणाले, जल, जमीन आणि जंगल यांचा विकास होणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने शहरे स्मार्ट होत चालली आहेत त्याच पद्धतीने येणार्या काळात आपली गावे स्मार्ट होणे गरजेचे आहे. कौशल्यपूर्ण शिक्षण हे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीस हातभार लावतो. परदेशात फामर्सी, नर्सिंग सेवकांची गरज मोठ्या प्रमाणात आहे, मात्र कौशल्यपूर्ण व्यक्तींचा अभाव जाणवतो. सीएसआरच्या माध्यमातून विद्यार्थी भविष्यासाठी सक्षम होत आहेत. सहकार, समन्वय आणि संवादातून कौशल्याधारित स्टार्टअप संस्कृती रुजू होत आहे. तंत्रज्ञान, संशोधन व ज्ञान या त्रिसूत्रीचा वापर करूनच रोजगार निर्मिती शक्य आहे. फ्यूएल ही संस्था उदयोगधंद्याना लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करत आहे. अशा विश्वास नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे.

डॉ. केतन देशपांडे म्हणाले, सोशल आंत्रप्रेन्यूअरशीपची चळवळ उभी करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आज ७८ कॉर्पोरेट कंपन्यांच्या समर्थनामुळे एक नवे शिक्षण मॉडेल सर्वांसमोर आहे. काळानुरूप आता व्हर्टीकल युनिव्हर्सिटीची गरज भासू लागली आहे. अशी भूमिका त्यांनी मांडली.

# महापालिकेची सत्ता आपल्याच हाती आली पाहिजे, शरद पवारांचा पुण्यात एल्गार

पुणे । प्रतिनिधी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपल्याला जागरूक रहावं लागेल. आपण गांधी-नेहरूंचा विचार मांडतो. निवडणुका होतील त्यावेळी आपण राष्ट्रवादी काँग्रेस म्हणून सामोरे जाणार आहोत असे मत शरद पवार (डहरीरव झरुरी) यांनी व्यक्त केले. ते पुण्यात बोलत होते. इतर ही काही पक्ष आहेत. त्यातील काही देशात तर काही राज्यात आपल्यासोबत लढतात. आता स्थानिक पातळीवर काय निर्णय घ्यायचा याबाबतचा निर्णय अध्यक्ष आणि सहकारी निर्णय घेतील. त्यात जागावाटपचाही निर्णय होईल असे शरद पवार म्हणाले. महापालिकेची सत्ता आपल्याच हाती आली पाहिजे, हाच निर्धार करायचा आहे. उद्या युती करायची की नाही? याचा निर्णय लवकरचं होईल. कोणाला संधी द्यायची हा ही निर्णय होईल असे पवार म्हणाले.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागे एक विचारधारा

राष्ट्रवादी काँग्रेसच्या मागे एक विचारधारा आहे. गांधी, नेहरू, आझाद यांची विचारधारा आहे. ही विचारधारा मजबूत करायची आहे. पुण्यात काँग्रेसची जबाबदारी अधिक आहे. काँग्रेस पक्ष स्थापन झाला याचा निर्णय, जन्म हा पुण्यात झाला आहे. दुर्दैवाने त्या आधी तीन दिवस प्लेगची साथ आली आणि पुण्याऐवजी मुंबई मध्ये काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. मात्र मूळ पुण्यात होतं. हे पाहता आपल्या पुणेकरांची जबाबदारी आहे. आजचं आणि १९८५ सालच्या पुण्यात जमीन-अस्मानचा फरक आहे. आज रस्त्याने जाणं अवघड आहे, दळणवळणाची साधन वाढली, वाहनं वाढली. आता पूर्वीच पुणे राहिलेलं नाही असे शरद पवार म्हणाले. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीनं आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यात शरद पवार बोलत होते.

**महापालिका निवडणुकीत सक्षम उमेदवार निवडून आणले पाहिजेत**

पुण्याचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यानुसार गरजाही वाढलेल्या आहेत. पाच लोकांच्या जागेत तीनशे ते चारशे लोक राहू लागलेत. पण या लोकांना मूलभूत सुविधा मिळतायेत का? याला उत्तर शोधायचं असेल तर महापालिका निवडणुका झाली पाहिजे. त्या निवडणुकीत सक्षम उमेदवार निवडून आणले पाहिजेत. यासाठी आपल्याकडे ते चेहरे आहेत. आपल्याला आता नैतिक जबाबदारी घ्यावी लागेल. इथली सूत्र आपल्या हातात येईल, याची काळजी आपल्याला घ्यायची आहे असे शरद पवार म्हणाले.

# मावळातील राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन माजी सभापती, तीन माजी उपनगराध्यक्ष, खरेदी-विक्री संघ, बाजार समितीचे संचालक यांच्यासह राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आज मुंबई येथे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आणि माजी राज्यमंत्री संजय भेगडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. मुंबई येथे भाजपच्या प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करून पक्षात अधिकृत प्रवेश दिला. या वेळी माजी राज्यमंत्री संजय बाळा भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, मावळ विधानसभा निवडणूकप्रमुख रवींद्र भेगडे, माजी सभापती निवृत्ती शेटे,



शांताराम कदम, रवींद्रनाथ दाभाडे, मंडलाध्यक्ष अभिमन्यू शिंदे, दत्तात्रय माळी, रघुवीर शेलार, वडगाव शहराध्यक्ष संभाजीराव म्हाळसकर आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाखाली देश आणि राज्याच्या प्रगतीचा नवा अध्याय रचला जातोय. भाजपच्या विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवून आज या सर्वांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

.दरम्यान, प्रवेश करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती बाबूराव वायकर, जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे माजी सभापती अतीश परदेशी, तळेगावचे माजी उपनगराध्यक्ष नेते रामदास काकडे, उपनगराध्यक्ष किशोर भेगडे, माजी उपनगराध्यक्ष संग्राम काकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव जाधव, राष्ट्रवादी युवकचे माजी जिल्हाध्यक्ष सचिन घोटकुले, जिल्हा उपाध्यक्ष संतोष मुऱ्हे, खरेदी-विक्री संघाचे सभापती शिवाजी असवले, संचालक बाजीराव वाजे, माजी नगरसेवक अरुण माने, पोटोबा महाराज देवस्थानचे विश्वस्त अरुण चव्हाण आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

# पुणे जिल्ह्यात मुसळधार पाऊसानंतर १७ धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरु

पुणे । प्रतिनिधी

संपूर्ण राज्यामध्ये तुफान पावसाने हजेरी लावली आहे. मुंबईसह पुण्यामध्ये कालपासून जोरदार पाऊस सुरु असून पावसाची संततधार सुरु आहे.



मुंबई, पुणे, ठाणे आणि पालघरला हवामान विभागाकडून ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुण्यामध्ये अजूनही पाऊस सुरु असून यामुळे रस्त्यावर पाणी साचल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस होत असल्याने धरणसाठ्यांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जिल्ह्यातील २६ धरणांपैकी तब्बल १७ धरणांतून पाणी सोडण्यात आले आहे.

परतीच्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचून नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. यात १५ सप्टेंबर रोजी पहाटे ३ वाजता थेऊर येथील रुके वस्ती जिल्हा परिषद शाळा परिसरात पाण्याचा मोठा बॅकवॉटर साचला. यामुळे १०० ते १५० नागरिक अडकले असल्याची प्राथमिक माहिती पोलीस नियंत्रण कक्षाचे एपीआय अंबिके यांनी दिली. दरम्यान थेऊर येथील बचावकार्य सुरू करून, यावर तातडीने स्थानिक नागरिक, प्रशासन आणि आपदा मित्र यांच्या मदतीने मदतकार्य सुरू झाले. पीएमआरडीएच्या पीडीआरएफ जवानांनी ३.३० वाजता घटनास्थळी दाखल होऊन बचावकार्य सुरू केले. त्याचवेळी एनडीआरएफ टीमलाही मदतीसाठी पाचारण करण्यात आले.

# भुयारी मार्गामध्ये मुख्यमंत्र्याचे पोस्टर लावणार यावर कारवाई करण्याची भापकर यांची मागणी

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

शहरात युगप्रवर्तक छत्रपती शिवराय व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फोटो भुयारी मार्ग व उड्डाणपुलाच्या भिंतीला लावण्यात आले आहेत यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचा देखील आव्हान होत आहे एक प्रकारे ही अवहेलना असून पोस्टर लावणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मारुती भापकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनाला केली आहे

निवेदनामध्ये मारुती भापकर यांनी पुढे म्हटले आहे की महाराष्ट्रात युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनावर बसलेल्या पुतळ्यासमोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अभिवादन करताना देवा भाऊ असा उल्लेख करून वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मीडियामध्ये जाहिरात बाजी करण्यात आली.या जाहिरातीचे लोण पिंपरी-चिंचवड शहरामध्ये पसरले व काही



लोकांनीअशा प्रकारचे भुयारी मार्ग (अंडर ग्राउंड) रस्ते तसेच उड्डाण पुलावरील भिंतीवरअसे देवभाऊ शिवरायांना अभिवादन करीत असणारे पोस्टर चिटकवले आहेत.हे पोस्टर चिकटवणारांनी अभिवादन करण्यासाठी लावले की विटंबना करायला असा प्रश्न निर्माण झालेला आहे?हे पोस्टर अश्या ठिकाणी लावले आहे की रस्यावर जाणार येणाऱ्या गाड्यांमुळे या पोस्टरवरील शिवरायांच्या व मुख्यमंत्र्यांच्या प्रतिमेवर चिखल उडतो आहे. आणखीन बऱ्याच गोष्टी या पोस्टर बाबत घडू शकतात. त्यामुळे युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज व घटनात्मक पदाव असणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेची विटंबना होत आहे. होणार आहे.तरी मी आपणास विनंती करतो की काही राजकीय स्वार्थ ठेवून ज्या ज्या ठिकाणी अशी बॅनर लावले असतील त्या त्या ठिकाणचे हे बॅनर तातडीने काढून टाकावेत. तसेच या सर्व ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासून या बॅनर लावणारे कोण? त्यांचा हे बॅनर अशा योग्य ठिकाणी लावण्याचा उद्देश नेमका काय आहे याचा छडा लावून संबंधित या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी. अशी मागणी मारुती भापकर यांनी एका निवेदनाद्वारे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त यांना केली आहे

# अश्लील वर्तन व मारहाण प्रकरणी आरोपींना शिक्षा; शिरूर न्यायालयाचा कठोर निकाल

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यात घडलेल्या अश्लील वर्तन व मारहाण प्रकरणी दोन आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. भारतीय दंड विधान कलम २९४, ३५२, ३४ अंतर्गत दाखल झालेल्या या गुन्ह्याचा निकाल काल (१२ सप्टेंबर) रोजी मे. सी. एम. खारकर सो. यांच्या न्यायालयात लागला.



गणेगाव दुमाला (ता. शिरूर) येथील प्रवीण रामराव गरुड (वय ३८) व रामराव बापूराव गरुड (वय ७१) या दोघांना न्यायालयाने दोषी ठरवत कलम २९४ अंतर्गत प्रत्येकी एक महिन्याची साधी कैद व दोन हजार रुपये दंड, तसेच कलम ३५२ अंतर्गत प्रत्येकी पाचशे रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. न्यायालयीन निकालामुळे गावात या प्रकरणाची चांगलीच चर्चा सुरू आहे.या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. सागर वसंतराव कदम व ॲड. ए. बी. शिर्के यांनी सरकारी बाजू प्रभावीपणे मांडली. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार ए. जे. जगदाळे यांनी काटेकोरपणे केला होता.याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे (पुणे ग्रामीण) व जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी आपली जबाबदारी पार पाडली. त्यांना पोलीस हवालदार तुकाराम गोरे व महिला पोलीस अंमलदार मनीषा फंड यांनी कोर्ट अंमलदार म्हणून साथ दिली. तर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक नकाते यांनी भूमिका बजावली.या निकालामुळे कायदा व सुव्यवस्थेवर विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. न्यायालयाने गुन्हेगारांना दिलेली शिक्षा ही समाजात अनुकरणीय ठरेल, अशी प्रतिक्रिया परिसरात उमटली आहे.

# रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनच्या रौप्यमहोत्सवाची शनिवारी होणार सांगता

**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकीतून समाजातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्यासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनचा रौप्य महोत्सव सांगता समारंभ शनिवार, दि. २० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने ‘ज्याचा त्याचा विठ्ठल’ हा संगीत-चित्र-नाट्य अभिवाचनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून कार्यक्रम कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.




कार्यक्रम सायंकाळी ४:३० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित करण्यात आला असून सहकार आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष रोटेरियन शेखर मेहता तसेच ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनच्या अध्यक्षा आश्विनी शिलेदार, सचिव श्यामल मराठे आणि रौप्य महोत्सव सांगता समारंभाचे संयोजक गणेश जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या २५ वर्षांपासून रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन सामाजिक उपक्रम राबवित आहे. रोटरी क्लब सभासद आणि रोटरी फाऊंडेशनने दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीतून अनेक सामाजिक उपक्रम उभे राहिले आहेत. सासवडला छोटा बंधारा बांधून पाण्याची वर्षभराची तरतूद करण्यात आली आहे. अवयव दान मोहीम राबवून गिनीज बुकमध्ये नोंद होण्याइतकी जागृती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील मुलांच्या टेक्निकल स्कूलसाठी इमारत बांधून ज्ञान प्रबोधिनी या संस्थेकडे सुपूर्त करण्यात आली आहे. सामाजिक जाणीव ठेवून सेवा देणाऱ्या फॅमिली डॉक्टरांचा आणि निरपेक्षपणे काम करणाऱ्या समाजसेवकांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरवही करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त, सहाय्यक आयुक्त, निरीक्षक, हवालदार यांचा मानसिक ताण कमी करण्यासाठी ज्येष्ठ व्यावसायिक तज्ज्ञ मिनोचर पटेल यांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रस्ता सुरक्षा, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, अंधशाळा, जीवनज्योत, प्रसन्न ऑटिझम या सारख्या संस्थांना रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनच्या माध्यमातून मदतीचा हात देण्यात आला आहे. कर्वेनगरमधील एक शाळा दत्तक घेण्यात आली असून सेवासदन संस्थेतील बी.एड.च्या विद्यार्थिनींसाठी तज्ज्ञांची व्याख्यानमाला आयोजित केली जाते. वयात येणाऱ्या युवतींसाठी ‘कळी उमलताना’ अशा वेगळ्या विषयावरील व्याख्यानांसह पंचवीस शाळांमध्ये इंटरनेट, गुगल, युट्यूब, एआयचा वापर करतानाचे धोके अशा विविध विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. कौटुंबिक हिंसाचार या विषयावर अनेक परिसंवाद आयोजित करून अनेकांचे संसार पुन्हा उभे केले आहेत. पीडित स्त्रियांना न्यायालयामार्फत व्यावसायिक शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वयंसिद्धा हा उपक्रम राबविण्यात आला. खेडेगावातील बोअरवेल्सचे पुनर्भरण, जिल्हा परिषद शाळेत संगणक वर्ग तयार करून देणे, मुलींसाठी स्वतंत्र वॉशरुम बांधून देणे अशी कामेही करण्यात आली आहेत. अनेक रुग्णालयांना डायलिसीस मशीन्स, व्हेन्टीलेटर अशी वैद्यकीय उपकरणे भेट दिल्याने गरीब रुग्णांना स्वस्तात वैद्यकीय सेवा मिळू लागल्या आहेत.रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवनच्या वाटचालीत अनेक संस्था, नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. अशा व्यक्तींचा व संस्थांचा या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे.